# संयुक्त महाराष्ट्र परिषद

## जळगांव येथील अधिवेशन

---

१३ एप्रिल १९४७

मूल्य आणे २

# संयुक्त महाराष्ट्र परिषद

## प्रतिनिधिसभेचें अधिवेशन

### प्रारंभ

ता. १२ मे १९४६ रोजीं बेळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या तिसाव्या अधिवेशनांत श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी मांडलेला संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण करण्यासंबंधीचा ठराव मंजूर झाला; व त्याची अंमलबजावणी करण्यासाठीं महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म. म. प्रो. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र समिति' स्थापन झाली. या समितीची पहिली सभा ता. २६ मे १९४६ रोजीं पुणें येथें भरून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी लोकमत प्रकट आणि संघटित करण्यासाठीं मुंबई येथें एक निमंत्रितांची सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत यावी असें ठरलें; व समितीचे सदस्य श्री. श्री. शं. नवरे यांच्यावर ती परिषद भरविण्याची जबाबदारी सोंपविण्यांत आली.

### महाराष्ट्र एकीकरण परिषद

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या या ठरावानुसार ता. २८ जुलै १९४६ रोजीं मुंबई येथें महाराष्ट्र एकीकरण परिषदेचें अधिवेशन अत्यंत उत्साहानें पार पडलें. त्या अधिवेशनांत संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना होऊन श्री. देव यांच्या अध्यक्षतेखाली तात्पुरत्या समितीचीहि निवडणूक करण्यांत आली. या समितितर्फे श्री. देव यांच्या आदेशानुसार ता. १ सप्टेंबर ते ३१ आक्टोबर १९४६ पर्यंत दोन महिन्यांच्या अवधींत १३८०३ सदस्य नोंदण्यांत आले. या सदस्यांनीं मुंबई शहर, महाराष्ट्र, गोमंतक, मराठवाडा, नागपूर आणि विदर्भ या संयुक्त महाराष्ट्राच्या निरनिराळ्या घटक विभागांतून एकंदर ४४ प्रतिनिधि निवडून दिले. निवडणुकी आटोपल्यानंतर ता. ६ फेब्रु. १९४७ रोजीं श्री. देव यांनी ता. १३ आणि १४ एप्रिल १९४७ रोजीं पूर्व खानदेशांत जळगांव येथें परिषदेच्या प्रतिनिधिसभेचें अधिवेशन भरविण्याचा आदेश दिला.

## परिषदेचे पदाधिकारी

अध्यक्ष— श्री. शंकरराव देव, पुणें

उपाध्यक्ष—१ म. म. प्रो. द. वा. पोतदार, पुणें

२ श्री. केशवराव जेधे, पुणें

३ श्री. ब्रिजलाल बियाणी, अकोला

४ श्री. पुनमचंद रांका, नागपूर

५ श्री. दिगंबरराव बिंदु, हैद्राबाद

कोषाध्यक्ष— श्री. दा. वि. गोखले, पुणें

मुख्य कार्यवाह— श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, नागपूर

कार्यवाह—१ श्री. श्री. शं. नवरे, मुंबई

२ डॉ. कृ. भी. अंत्रोळीकर, सोलापूर

३ श्री. व. ना. नाईक, नाशिक

४ सौ. प्रमिला ओक, अकोला

कार्यकारी सदस्य—(१) श्री. श्री. अ. डांगे, मुंबई (२) रा. सा. गं. म. ठवरे, नागपूर (३) श्री. पू. घ. राहांगदाळे, गोंदिया (४) श्री. भा. वि. शेंडे, वर्धा (५) डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती (६) श्री. आ. कृ. वाघमारे, औरंगाबाद (७) श्री. त्र्यं. शि. भारदे, अहमदनगर (८) डॉ. गो. शा. कोवाडकर, बेळगांव (९) सौ. इंदिराबाई पाटणकर, जळगांव (१०) श्री. मा. के. सहस्त्रबुध्दे, पनवेल (११) श्री. अब्दुल करीम खुंजे, सोलापूर (१२) श्री. का. इ. खाडिलकर, सांगली (१३) श्री. ग. गो. नाईक, ठाणें (१४) श्री. दि. गो. अनगळ, अमरावती

हिशेब तपासनीस—श्री. आ. रा. भट, पुणें

हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाल्यावर प्रो. पोतदार यांनी परिषदेच्या घटनेंत आपण सुचविलेल्या दुरुस्त्या पुस्त्या वाचून दाखविल्या. त्यांवर चर्चा होऊन परिषदेचे सदस्य ता. १ मे पासून ता. १ ऑगस्टपर्यंत पुढील तीन महिन्यांत एक लाखपर्यंत वाढविण्याचें आणि प्रतिनिधिसभेची पुरवणी निवडणूक करण्याचें ठरलें.

# प्रतिनिधिसभेचें खुलें अधिवेशन

सायंकाळीं ६ वा. जळगांवच्या नगरभवनांत प्रतिनिधिसभेच्या खुल्या अधिवेशनाला श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहानें सुरवात झाली. परिषदेचे प्रतिनिधि, संघटक आणि प्रमुख कार्यकर्ते, महाविदर्भ सभेचे सर्व निमंत्रित सदस्य आणि जळगांवांतलि निरनिराळया पक्षांचे प्रमुख नागरिक अधिवेशनाला उपस्थित होते. प्रथम स्वागतगीत झाल्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. ह. वि. पाटसकर यांनी आपलें भाषण वाचून दाखविलें. त्यांतील महत्वाचा भाग पुढें दिला आहे.

## स्वागताध्यक्ष श्री. पाटसकर यांचें भाषण

"महाराष्ट्राची विभागणी हल्लीं ब्रिटिश अंमलाखालील दोन प्रांत, निजामचें संस्थान, कोल्हापूर, दक्षिणेकडील इतर सुमारें १५ संस्थानें, इंदूर संस्थानचा कांहीं भाग व पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतकाचा भाग अशा निरनिराळ्या राजकीय व राज्यव्यवस्थेच्या घटकांत झालेली आहे. समुद्र, तापी, वैनगंगा, नर्मदा, कृष्णा व गोदावरी यांनीं परिवेष्टिलेला असा हा प्रदेश आहे. या प्रदेशाचें अंदाजें क्षेत्रफळ १ लक्ष ५० हजार मैल आहे. त्याची लोकसंख्या अजमासें तीन कोटी आहे. याच प्रदेशांत आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी असलेलें मुंबईसारखें व्यापाराचें केंद्र व बंदर आहे. उद्योगधंद्याच्या दृष्टीनें मुंबई, सोलापूर, खानदेश, नागपूर, अकोला, एलिचपूर, पुलगांव, बऱ्हाणपूर वगैरे ठिकाणीं मोठमोठे सूत व कापडाचे कारखाने आहेत. तसेच ह्या प्रदेशांत कांच कारखाने व लोखंडी कारखानेही आहेत. शिक्षणाकरितां प्रसिद्ध असलेलीं मुंबई, पुणें, नागपूर या सारखीं शहरें आहेत. हा प्रदेश सर्वसाधारणपणें सुपीक असून त्यांत सर्व प्रकारचीं धान्यें, गळिताचीं पिकें व कापूस निर्माण होतो. तसेंच ह्या भागांत ज्या ठिकाणीं कालव्याचें पाणी आहे, त्या ठिकाणीं गूळ व साखरेचे मोठमोठे कारखाने आहेत. या प्रकारें व्यापार, उद्योगधंदे व अन्नधान्य यांनीं समृद्ध अशा ह्या प्रदेशांत जंगलेंही पुष्कळ असून जंगलसंपत्तीही विपुल आहे. कालव्यांची व्यवस्था करतां येईल अशा मोठमोठ्या नद्या ह्या प्रदेशांत आहेत.

## ही भूमि वीरप्रसू आहे

महाराष्ट्राची संस्कृति व परंपरा फार उज्ज्वल आहे. महाराष्ट्राची भूमि ही वीरप्रसवा आहे व ह्या भूमींत श्रीछत्रपति शिवाजमिहाराज, बाजीप्रभु व पहिले बाजीराव यांसारखे अनेक वीरपुरुष निर्माण झाले; इतकेच नव्हे, तर अशा वीरपुरुषांची ती कर्मभूमि आहे. त्याचप्रमाणें उच्च सांस्कृतिक वातावरण निर्माण करणारे ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास या सारखे अनेक साधुसंतही ह्याच भूमींत निर्माण झाले; व त्यांची परंपरा अद्यापपावेतों आजही या भागांत कायम आहे. ऐतिहासिक कारणांमुळें या प्रदेशाचा कारभार एकजिनसी न चालविला गेल्यानें तो प्रदेश छिन्नविच्छिन्न झालेला आहे; व हेंच महाराष्ट्राच्या अवनतीचें मुख्य कारण आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, ब्रिटिशांना जसजशी, ज्या ज्या वेळीं ज्या ज्या भागावर आपली सत्ता प्रस्थापित करतां आली, तसतसे त्या त्या वेळीं निरनिराळे गट त्यांनीं फक्त त्यांच्या राज्यकारभाराच्या सोयीचे दृष्टीनें एकत्रित केले; व असें करतांना त्या भागांच्या उत्कर्षाकडे मुळींच लक्ष दिलें गेलें नाहीं. त्यामुळें आजचा महाराष्ट्र हा असा अनवस्थेंत व दुरवस्थेंत खितपत पडला आहे.

## महाराष्ट्राचीं निरनिराळीं शकलें

ब्रिटिश राजवटीच्यापूर्वी कांहीं काळ देशामध्यें सर्वसाधारणपणें बेबंदशाही निर्माण झालेली होती. अनेक लहान लहान राज्यें निरनिराळ्या अवस्थेंत त्या वेळीं ह्या देशांत होती. त्यांचें एकमेकांविरुद्ध सारखें आक्रमण चालू होतें; व त्याचा फायदा ब्रिटिशांना आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या कामांत भरपूर घेतां आला. त्या काळच्या परिस्थितीचा विचार करूनच त्यांनीं आपल्या सत्तेच्या सोयीकरितां निरनिराळ्या ठिकाणीं संस्थानें राखून ठेविलीं. ब्रिटिशांच्या कृपेनें केवळ त्यांच्याच सोयीस्तव कृत्रिम रीत्या जगविण्यात आलेल्या या संस्थानांकडे सार्वभौमत्व शिल्लक राहिलें आहे असें कांहीं म्हणणें, म्हणजे सार्वभौमत्वाचा उपहास आहे. अशाच संस्थानांपैकीं हल्लीचें निजाम संस्थान हें एक आहे. महाराष्ट्रांतला पंचावन लक्ष लोकसंख्येचा भाग 'मराठवाडा' ह्या नांवानें संबोधिलेला त्या संस्थानाच्या अंमलाखालीं आहे. महाराष्ट्रांतला उत्तरेकडील भाग म्हणजे नागपूर व वऱ्हाडचा भाग हा हल्लीं मध्यप्रांत व वऱ्हाड ह्या प्रांतांत गोवलेला आहे. महाराष्ट्राचा

दक्षिणेकडील कांहीं भाग मुंबई इलाख्यांत सामील झालेला आहे, कांहीं भाग निजामचे राज्यांत समाविष्ट आहे, कांहीं भाग कोल्हापूर व इतर संस्थानांत समाविष्ट झालेला आहे, तर कांहीं भाग ब्रिटिश सत्तेपासून अगदीं भिन्न असलेल्या पोर्तुगीज सत्तेच्या अंमलाखाली आहे. अशीं महाराष्ट्राचीं अनेक शकलें आज निरनिराळ्या राज्यसत्तांखालीं वाटलीं गेलेलीं आहेत.

## विभागणीमुळें झालेलें नुकसान

गेल्या सुमारें दीडशें वर्षांपासून निर्माण झालेल्या या पारीस्थितीमुळें महाराष्ट्राचें सर्वस्वी नुकसान झालेलें आहे. निरनिराळ्या भागांतील राज्यव्यवस्थाही आजसुद्धां निरानिराळ्या अवस्थेंत आहे. मुंबई व मध्यप्रांतांत समाविष्ट असलेल्या महाराष्ट्राचे भागांची राजकीय व्यवस्था कांहीं बाबतींत सारखी आहे. परंतु त्यांचेच लगत असलेल्या निजामचे संस्थानांत समाविष्ट झालेल्या महाराष्ट्राची व्यवस्था आजदेखील संपूर्णपणें एकतंत्री आहे. तसेंच दक्षिणी संस्थानांच्या अंमलाखालीं असलेले महाराष्ट्रांतील निरनिराळे भाग भिन्न भिन्न राजकीय अवस्थेंत आहेत. सामान्यपणें त्या भागांत कारभारही एकतंत्री पद्धतीचाच आहे. पोर्तुगीज अंमलाखालीं असलेला भाग तर ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत असलेल्या कोणत्याही प्रदेशापेक्षां राजकीय दृष्ट्या अधिकच मागासलेला आहे. परतंत्र अशा संस्थानांतील निरनिराळ्या भागांवर जी एकतंत्री राज्यव्यवस्था आहे, त्यांतही धर्म व जात यांचाच पगडा दिसून येतो. अशा ह्या महाराष्ट्र देशाच्या अनैसर्गिक वाटणीमुळें ह्या प्रदेशाची योग्य वाढ झालेली नाहीं. इतकेंच नव्हे, तर असे हे विखुरलेले भाग ब्रिटिश राजवटींत भिन्न भिन्न भागांशीं जोडण्यात आले व त्याचाही परिणाम अनैसर्गिक स्पर्धा व आर्थिक आक्रमण असा झाला. मुंबई इलाख्यांत सामील असलेल्या महाराष्ट्रांत उद्भवलेले कानडी-मराठी व मराठी-गुजराथी वाद व मध्यप्रांतांतील मराठी-हिंदुस्थानी वाद हे ह्या गोष्टींचे द्योतक होत. मुंबई इलाख्यांत महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटक असे तीन विभिन्न भाषांचे विभाग आहेत; व त्यांच्या आपसांतील स्पर्धेमुळें महाराष्ट्राचा भाग गुजराथ व कर्नाटक ह्यांचे दडपणाखालीं सांपडला आहे, असें म्हणणें अप्रस्तुत होणार नाहीं. अशीच स्थिती मध्यप्रांत व वऱ्हाड ह्या प्रांतांत महाविदर्भाची आहे. निजामाचे हद्दींतील मराठी प्रांताची दुर्दशा तर प्रसिद्धच आहे.

## काँग्रेसची अनुकूल भूमिका

महाराष्ट्राची भाषा मराठी आहे; व ही भाषा बोलणारे लोक ज्या ज्या भागांत बहुसंख्येनें राहतात, त्या त्या सर्व भागांचा एक प्रांत करण्यांत यावा, ही महाराष्ट्रीयांची साधी मागणी आहे. ही मागणी करण्याचा मुख्य उद्देश, आजपर्यंतचा पूर्वेतिहास लक्षांत घेतां, या प्रांताची सर्वतोपरी उन्नति व्हावी व स्वतंत्र हिंदुस्थानचा तो एक स्वयंपूर्ण व प्रभावी घटक बनावा, असाच आहे. महाराष्ट्राप्रमाणेंच इतरही एकच भाषा असणारे निरनिराळे भाग निरनिराळ्या राज्यव्यवस्थेखाली ह्या भारतवर्षात आहेत; व त्यांचेही असेंच नुकसान झालेलें आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां अस्तित्वांत आलेली प्रमुख राजकीय संस्था जी कॉंग्रेस हिच्या लक्षांत ही गोष्ट फार वर्षांपूर्वी आली; व १९२० सालीं नागपूर येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाचें वेळी कॉंग्रेसची घटना तयार करतांना भाषावार प्रांतरचनेचें तत्व मान्य करण्यांत आल. त्या घटनेमध्यें हिंदुस्थानांत भाषावार २१ प्रांत करण्यांत आले. तसेंच १९३७ सालीं निरनिराळ्या प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें स्थापन करण्यांत आल्यानंतर आंध्र प्रांत अलग करण्याच्या तत्वाला मद्रासमध्यें मान्यता देण्यांत आली. तसेंच कर्नाटकचा स्वतंत्र प्रांत करण्याबद्दलचा ठराव मुंबई विधिमंडळांत मंजूर करण्यांत आला. तसेंच राष्ट्र-सभेच्या कार्यकारिणीने वर्धा येथील आपल्या बैठकींत त्याच सुमारास एक ठराव करून त्यामध्यें असें स्पष्ट केले आहे कीं, ज्या वेळीं भावी स्वतंत्र हिंदुस्थानचें सरकार स्थापन करण्याचा अधिकार कॉंग्रेसला प्राप्त होईल, त्या वेळीं भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न हातीं घेऊन तो सोडविण्यांत येईल. मात्र स्वातंत्र्याचे प्रयत्नांत अडचण येऊं नये म्हणून भाषावार प्रांतरचनेची चळवळ तूर्त करण्यांत येऊं नये, अशीही इच्छा त्या ठरावांत व्यक्त करण्यांत आली होती. हेंच तत्त्व १९४५-४६ सालीं कॉंग्रेसनें निवडणुकीबाबत जो जाहीरनामा काढला, त्यांतही मान्य करण्यांत आलेलें आहे. कॉंग्रेसचा आजपर्यंतचा इतिहास लक्षांत घेतां व कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांची जबर निष्ठा विचारांत घेतां ही गोष्ट कॉंग्रेसकडून योग्य वेळीं, योग्य प्रकारें अमलांत आणली जाईल, हें निःसंशय !

## एकीकरणाच्या मार्गांतील अडचणी

ह्याप्रमाणें महाराष्ट्र प्रांत निर्माण करण्याची आवश्यकता कशी व किती आहे ह्यासंबंधी माझे विचार आपल्यापुढें मांडल्यानंतर ह्या मार्गांत

अडचणी काय काय आहेत, याचें मी आतां थोडक्यांत दिग्दर्शन करणार आहे.

## वऱ्हाडचें भवितव्य

(अ) ब्रिटिश अंमलाखालीं जो महाराष्ट्राचा भाग आहे, त्याचे एकीकरण करणें फारसें अवघड नाहीं. प्रश्न फक्त थोडासा विचार करण्यापुरता विदर्भाचा आहे. विदर्भ हा भाग एके काळीं निजामचे अंमलाखालीं होता. परंतु पूर्वीचा इतिहास पाहूं जातां तो त्यापूर्वीही नागपूरकर भोसल्यांच्या अंमलाखाली होता. पूर्वी कोणाच्याही अंमलाखालीं असला, तरी त्या भागाचा प्रत्यक्ष राज्यकारभार १८५३ सालापासून ब्रिटिश पाहात आले आहेत. एके काळीं लॉर्ड रीडिंग हिंदुस्थानचे व्हाइसरॉय असतांना वऱ्हाड परत मिळविण्याकरितां निजामांनीं प्रयत्न चालविला होता; व त्या वेळीं आपण ब्रिटिशांचे बरोबरीचे दोस्त आहोत, असें त्यांनीं प्रतिपादिलें होते. त्या वेळीं हा प्रांत परत देण्याचे नाकारतांना निजाम हे ब्रिटिशांचे बरोबरीच्या नात्याचे दोस्त नाहींत ही गोष्ट निजामाला स्पष्टपणें बजावून सांगण्यांत आली होती. १९३५ सालचा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट करतांना मात्र ब्रिटिशांनी आपल्या धोरणांत ह्या बाबतींत ढिलेपणा दाखविला असें दिसतें. परंतु, १९३६ मध्यें हिंदुस्थानचे बादशाहा व हैद्राबादचे निजाम ह्यांचे दरम्यान जो करार झाला, त्यांत संघटित हिंदुस्थानचा वऱ्हाड हा एक भाग असल्याचें तत्व मान्य करण्यांत आलें आहे. ता. १६ मे १९४६ रोजी ब्रिटिश सरकारनें जें निवेदन जाहीर केलें आहे त्यायोगें देशांतील राजकीय परिस्थितींत फार मोठा बदल झालेला आहे. त्या निवेदनानुसार हिंदुस्थानची भावी राज्यघटना ठरविण्याकरितां निवडलेली घटनासमिती ही एक सार्वभौम अशी समिती आहे. त्या समितीवर ब्रिटिश हिंदुस्थानच्या भागातर्फे म्हणून जे प्रतिनिधी निवडण्यांत आलेले आहेत, त्यांत वऱ्हाडचेही चार प्रतिनिधी आहेत. सबब वऱ्हाड हा हल्लीं असलेल्या ब्रिटिश हिंदुस्थानचाच एक भाग आहे याबाबत कांहीं एक वाद शिल्लक राहूंच शकत नाहीं. मुस्लीम लीगच्या प्रतिगामी राजकारणामुळें हल्लीं ह्या देशांत अनेक आपत्ति उद्भवलेल्या आहेत. त्या सर्वांचा विचार करण्याचा हा समय नाहीं व प्रसंगही नव्हे. परंतु इतकें खास कीं, ब्रिटिश सरकारनें १९४८ च्या जूनमध्यें आपण आपला हिंदुस्थानांतील अमल

संपुष्टांत आणणार असे जाहीर केल्यापासून सर्व देशांत एक निराळें वातावरण निर्माण झालें आहे. स्वातंत्र्य इतकें जवळ आल्यानंतर व तें मिळणार हें निश्चित झाल्यानंतर अनेक प्रतिगामी शक्ति आपली डोकीं वर काढूं लागल्या आहेत. पाकिस्तानची सुखस्वप्नेंही सूक्त मार्गांनी नव्हे तर अन्य मार्गांनीं खरी करण्याचे प्रयत्नही चालू झालेले आपणांस दिसतात; व निजामचे राज्य हें एक दक्षिण हिंदुस्थानांतील पाकिस्तान आहे असा दावा मुस्लीम लीगच्या कांहीं पुढाऱ्यांनीं सुरू केला आहे. ज्या निजामाचे राज्यांत शेकडा ८० पेक्षां जास्त वस्ती हिंदूंची आहे, तो भाग केवळ तेथल्या संस्थानिकाचा धर्म इस्लाम आहे म्हणून पाकिस्तान होऊं शकेल, अशी विचारसरणी त्याचे मार्गे दिसते. परंतु, तेच पुढारी इतरत्र मात्र ज्या ठिकाणीं इस्लामधर्मीय बहुसंख्य आहेत ते भाग पाकिस्तानांत समाविष्ट करावेत, अशी मागणी करतात. या सर्वांचा अर्थ राजकीय पक्ष हें नांव धारण केलेला हा जातीय पक्ष प्रतिगामी आहे एवढाच होतो; व आज देशामध्यें सर्व प्रतिगामी शक्ति एकत्रित होत असल्याचें दृश्य दिसत आहे. त्याचाच भाग म्हणून कदाचित् पुढें मागें, वऱ्हाड हा आपले संस्थानांत सामील करण्यांत यावा, अशी मागणी निजामाकडून केली जाण्याचा संभव आहे. सर्व जगामध्यें राजशाही संस्था बहुतांशीं नष्ट झालेल्या आहेत. हल्लीचें युग हें राजशाही युग खास नव्हे. ब्रिटिशांच्या कृपेमुळें राजशाहीचे अत्यंत लहान व विकृत अवशेष म्हणून बहुतेक संस्थानें शिल्लक आहेत. त्यांनी स्वतःकडे सार्वभौमत्व असल्याचा बहाणा करणें हें हास्यास्पद आहे. म्हणून, निजामसाहेबांनी जरी वऱ्हाडचा प्रदेश आपले संस्थानांत सामील करण्याचा प्रयत्न केला, तरी त्या मागणीला आणि प्रयत्नाला कायदेशीर आधार नाहीं. इतकेंच नव्हे, तर ही मागणी जगांतील व देशांतील राजकीय प्रवाहांचे विरुद्ध आहे व स्वतंत्र हिंदुस्थान कोणत्याहि परिस्थितींत अशा प्रकारचे प्रयत्न हाणून पाडल्याशिवाय राहाणार नाही, अशी माझी खात्री आहे.

## मराठवाड्याचा प्रश्न कसा सुटेल ?

(ब) प्रत्यक्ष निजाम संस्थानचे हद्दींत महाराष्ट्राचा जो भाग आहे, तो स्वतंत्र महाराष्ट्र प्रांतांत सामील होण्यास जरा अवधि लागण्याचा संभव आहे. १९४८ चे जूनमध्यें ब्रिटिश सत्ता ह्या देशांतून नाहींशीं होणार असल्यानें अनेक

अधिक निकडीचे प्रश्न आपणांपुढें उद्भवले आहेत. एकंदर संस्थानिकांचा प्रश्नही त्यांपैकींच एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या प्रश्नाचा लवकर निकाल करण्याचें बाबतींत संस्थानिकांकडून अनेक अडचणी निर्माण केल्या जात आहेत. अर्थात् ह्या ठिकाणीं हें नमूद केलें पाहिजे कीं, बऱ्याच संस्थानिकांनीं काळाचा बदलता ओघ लक्षांत आणून आपल्या विचारांत आणि आचारांत बदल करण्याचें निश्चितपणें जाहीर केलें आहे. कोणाच्या का प्रेरणेनें असे ना, निजाम सरकार मात्र एक प्रकारें अशा प्रयत्नांपासून आज तरी अलग आहे. मात्र अशीं थोडींशीं संस्थानें जगाच्या मार्गे राहून फार काळ टिकूं शकतील, असे मला वाटत नाहीं. व्यवहारदृष्ट्या आणखी कांहीं काळ तरी निजामसंस्थानांतील ह्या भागाला महाराष्ट्र प्रांतांशी जोडण्याचें काम लांबणीवर पडेल असें दिसतें. दक्षिणी संस्थानांत समाविष्ट असलेला भाग महाराष्ट्र प्रांतांत सामील करून घेण्याचा प्रश्न तितकासा अवघड नाहीं. दक्षिणी संस्थानें आपला संघ करीत असून अशा संघाच्या स्थापनेनें हा प्रश्न सुटण्यास मदत होण्याचा संभव आहे.

## गोमंतकहि स्वतंत्र होईल

(क) पोर्तुगीज अंमलाखालील भाग याची परिस्थिती याहूनही भिन्न आहे. स्वतंत्र हिंदुस्थानच्या दूर अशा एका लहान कोपऱ्यांत एक लहान भाग पूर्णपणें आपले सत्तेखालीं ठेवणें हें पोर्तुगीज सरकारला पुढील काळीं शक्य होईल असें वाटत नाहीं. हिंदुस्थानसारख्या अफाट देशावर ब्रिटिशांची परकीय सत्ता कायम असल्यामुळेंच ही गोष्ट आजपर्यंत शक्य झाली. परंतु यापुढें ती तशी पोर्तुगीजांना शक्य व सोयीची राहील, असें मला मुळींच वाटत नाहीं.

## प्रश्न डावलला जाणार नाहीं

हल्लींची घटनासमिती ही १६ मे १९४६ च्या ब्रिटिश निवेदनामुळें अस्तित्वांत आली असली, तरी ती आतां स्वतंत्र आहे. मुस्लीम लीगचा गट धर्माच्या नांवाखालीं ह्या समितींत भाग घेत नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याला एके काळीं मान्य असलेली ही घटनासमितीही आज अमान्य आहे. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या विशिष्ट प्रांतांवर स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची मुस्लीम लीगची मागणी आहे. हा प्रश्न बाकी सर्व प्रश्नांपेक्षां स्वतंत्र हिंदुस्थानचे अस्तित्वाचे दृष्टीनें

अधिक महत्वाचा आहे. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न हा पाकिस्तानचा प्रश्न अनिर्णीत असतांना धसास लावणें व्यवहार्य व सोईचे नाहीं, असा एक प्रबळ प्रवाह आहे. याचा अर्थ मात्र हा जिव्हाळ्याचा प्रश्न डावलला जाईल असा करण्याचे कांहींच कारण नाहीं. पाकिस्तानच्या प्रश्नाचा निकाल अत्यंत नजिकच्या काळांत लावण्यांत आला पाहिजे व तो तसा लावला जाईल अशी माझी खात्री आहे. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचें स्थान म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र प्रांताचें स्थान व महत्व स्वतंत्र व संयुक्त हिंदुस्थानचे प्रश्नानंतरचें आहे हें निर्विवाद होय.

### महाराष्ट्रांत स्थायिक झालेल्या अन्यप्रांतीयांचा विरोध

संयुक्त महाराष्ट्र प्रांताची मागणी ही साधी व सरळ आहे. ही मागणी करतांना ज्या कोणा विभागाची इच्छा नसेल त्यास नाखुषीने त्याचे इच्छेविरुद्ध ह्या प्रांतांत समाविष्ट करावे अशी कुणाचीही इच्छा नाहीं. या चळवळीचा उद्देश फक्त विच्छिन्न झालेला महाराष्ट्र एकत्रित करण्यांत यावा व अशा एकत्रित महाराष्ट्राची उन्नति व्हावी, एवढाच आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेमुळें महाराष्ट्राची आर्थिक सूत्रें आज महाराष्ट्राबाहेरील लोकांचे हातांत आहेत. त्यापैकी पुष्कळ लोक पिढ्यानपिढ्या महाराष्ट्रांत राहिले असल्यानें मी तरी त्यांना महाराष्ट्रीयच समजतो; व केवळ एके काळीं ते अगर त्यांचे पूर्वज महाराष्ट्राबाहेरून आले म्हणून महाराष्ट्रीयांचा त्यांना विरोध आहे असें नाहीं. मात्र इतकें खरें कीं, अशा लोकांनीं आपली दृष्टि ज्या महाराष्ट्रांत ते येऊन राहिले व आर्थिक दृष्ट्या संपन्न झाले, त्याच महाराष्ट्राचे कल्याणाकडे वळविली पाहिजे; व महाराष्ट्राबाहेरील त्यांचा ओढा कमी केला पाहिजे. महाराष्ट्राचें शोषण न करतां सबंध महाराष्ट्र संपन्न करण्यास ह्या लोकांचे सहाय्य महाराष्ट्रास पाहिजे आहे. दुर्दैवानें अशा कांही लोकांचेकडून महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणास उघड वा प्रच्छन्न रीतीनें विरोध होत असल्याचें आज दिसून येत आहे. मुंबई हें शहर उघड उघड महाराष्ट्राचा प्रमुख भाग आहे. असें असतां त्या शहराचीं आर्थिक सूत्रें ज्या लोकांचे हातांत आहेत, ते लोक महाराष्ट्राची भाषा बोलणारे नाहींत, एवढ्याच कारणावरून तें शहर महाराष्ट्राचा भाग नाही अगर तें शहर महाराष्ट्रापासून अलग करण्यांत यावे, असें म्हणणें गैर व वस्तुस्थितीस सोडून आहे, इतकेंच नव्हे तर स्वार्थीपणाचेंहि आहे. तसेंच महाविदर्भाची नुकतीच सुरू

झालेली चळवळ ही एक संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे अंग असतां कांहीं लोकांकडून याही चळवळीस विरोध केला जात आहे, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. मला तरी ह्या सर्व कारवाईच्या बुडाशी वैयक्तिक व व्यवसायनिष्ठ स्वार्थांचा उग्र दर्प येतो. खरोखर ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. मला अशा सर्व इसमांना व व्यक्तींना नम्रपणें सांगावेसें वाटतें कीं, संयुक्त महाराष्ट्रांत महाराष्ट्रीय या नात्यानें आपणांस फार मोठें स्थान आहे. परंतु महाराष्ट्रांत एके काळीं असलेल्या जातीय वादांचा फायदा घेऊन अगर आणखी कांहीं वाद निर्माण करून आपलें स्थान टिकविण्याचा प्रयत्न करणें गैरवाजवी आहे. इतकेंच नव्हे, तर आपण असे प्रयत्न केल्यास त्याचे अनिष्ट परिणाम आपल्या विरुद्धच झाल्याशिवाय राहणार नाहींत. हल्लींच्या मुंबई प्रांतांत समाविष्ट असलेल्या भागांपैकीं गुजराथ हा एक विभाग आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत असलेला गुजराथचा भाग लहान असल्यानें महाराष्ट्र प्रांताशी हा भाग संलग्न करणें फारसें कठीण जाईल, असें मला वाटत नाहीं. संयुक्त महाराष्ट्राचे चळवळीचा उद्देश संलग्न असलेल्या दुसऱ्या एखाद्या विभागास विरोध करण्याचा नाहीं व तसें करण्याचे कारणही नाहीं.

## हा आक्षेप चुकीचा आहे

संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्याकडे आणखी एका साशंक दृष्टीनें आक्षेपकांकडून पाहण्यांत येतें. त्यांचें म्हणणें असें कीं, १९४८ च्या जूनमध्यें ब्रिटिश आपली सत्ता सोडून जाणार असल्यामुळें हिंदुस्थान देश आज स्वातंत्र्याचे दारांत उभा आहे. स्वतंत्र हिंदुस्थानास आपलें स्वातंत्र्य टिकविण्याकरितां अनेक बिकट प्रश्नांना तोंड द्यावयाचें आहे. मुस्लीम लीगकडून ह्या सत्तासंक्रमण प्रसंगीं देशभर धुमाकूळ घालण्यांत येत आहे. कांहीं कांहीं प्रतिगामी संस्था देशांत कलह निर्माण करण्याचे उद्योगांत आहेत. अशा वेळीं संयुक्त महाराष्ट्राचा अगर भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न उभा करणें वाजवी नाहीं. स्वतंत्र व संयुक्त हिंदुस्थानचे प्रश्नाचा निकाल पुढील थोड्या काळांत लागणारच आहे. अशा स्वतंत्र व संयुक्त हिंदुस्थानचा एक प्रभावी घटक म्हणूनच राहण्याची महाराष्ट्राची इच्छा आहे व तेंच या चळवळीचें उद्दिष्ट आहे. स्वतंत्र व संयुक्त हिंदुस्थान स्थापण्याचे कार्यास मदत होईल, अशाच रीतीनें ही चळवळ करण्यांत येईल, अशी मला खात्री व आशा आहे.''

## यशश्चिंतनाचे संदेश

स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर स्वागतमंडळाचे कार्यवाह श्री. आ. शा. देशपांडे यांनी परिषदेला आलेले ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर, मध्यप्रांत-वऱ्हाडचे स्थानिक स्वराज्यमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र, श्रीमंत प्रतापसिंह-महाराज भोंसले, रावसाहेब पटवर्धन, श्री. शंकरराव मोरे, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. वसंतराव नाईक (नाशिक), श्री. भाऊसाहेब हिरे, ना. बाळासाहेब खेर, रा. ब. भाऊसाहेब खळतकर (काटोल-डिप्रस), बॅ. ढोले (अमरावती), रावसाहेब ठवरे (नागपूर), श्री. बाबुराव चरणकर (सातारा), श्री. शूरसेन जयकर (विलेपार्ले), ना. ब्रिजलालजी बियाणी, सौ. प्रमिला ओक, यवतमाळ जिल्हा असोसिएशन, इंदूरचें महत्वाकांक्षी बालोद्धार मंडळ इत्यादि व्यक्ति आणि संस्था यांचे संदेश वाचून दाखविले. यापैकीं महाकोशलचा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्यासाठीं स्थापन झालेल्या समितीचे अध्यक्ष ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचें पत्र पुढें दिलें आहे:—

### ना. पं. मिश्र यांचा संदेश

प्रियवर माडखोलकरजी, नागपूर, ता. ४।४।४७

संयुक्त महाराष्ट्र की परिषद में सम्मिलित होने के संबंध में आपका कृपापत्र प्राप्त हुआ। मै मैसूर राज्य के उद्योगधंदे देखने के लिए जा रहा हूं, अतएव सम्मिलित न हो सकूंगा। अनुपस्थिति के लिए क्षमा चाहता हूं।

संयुक्त महाराष्ट्र का निर्माण अत्यावश्यक है। मराठी भाषाभाषी भारतीय राष्ट्रमें अपना उचित स्थान तभी प्राप्त कर सकेंगे, जब वे शासन की दृष्टीसे अपना एक संयुक्त प्रांत बना सकेंगे। उनके अनेक गुणों से सम्पूर्ण राष्ट्रभी तभी लाभ उठा सकेगा, जब वे एक सूत्र में बंध कर सशक्त हो जावेंगे।

मै आपके द्वारा परिषद को विश्वास दिलाना चाहता हूं कि महाकोशल के लोग महाराष्ट्र के एकीकरण के शुभ प्रयत्न में जो भी सहायता दे सकते है

उसके देने के लिये सदा प्रस्तुत रहेंगे। हम हिन्दीभाषियों के सहवास से हमारे महाराष्ट्र बंधुओ ने कुछ प्राप्त किया है या नहीं, इसका निर्णय वे स्वयं करें, परंतु हिंदीभाषी महाकोशल की ओर से मै निस्संकोच कह सकता हूं कि, महाराष्ट्रीय बंधुओसे हमने बहुत कुछ सीखा है। अतएव उनके एकीकरण में सहायक होना हम अपना कर्तव्य समझते है। इस एकीकरण के प्रश्नपर यदि किसी मराठीभाषी बंधु के मनमें कोई संशय है तो उसे अब दूर कर देना चाहिए। मै आपके परिषद के कार्य में सफलता का अभिलाषी हूं।

भवदीय,

द्वारकाप्रसाद मिश्र

## श्री. प्रतापसिंहमहाराज भोंसले यांचा संदेश

त्याचप्रमाणे नागपूरच्या भोसले घराण्यांतील धाकट्या पातीचे प्रमुख आणि मध्यप्रांतीय कायदेमंडळाचे सदस्य श्रीमंत प्रतापसिंहमहाराज भोंसले यांचेंहि पत्र पुढें दिलें आहेः—

नागपूर, ता. १० एप्रिल १९४७

श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांस,

न. वि. वि. संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाचें निमंत्रण पोंचलें. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मला उपस्थित राहतां येत नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. आज प्रांतांचें स्वातंत्र्य आणि त्यांची पुनर्घटना या दोन्ही प्रश्नांना अतिशय महत्व आलें असून, हिंदुस्थानचा राजकीय नकाशा पूर्ण बदलून जाण्याचा रंग सध्यां दिसत आहे. अशा वेळीं सर्व मराठीभाषी प्रदेशाचें एकीकरण होऊन संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबरोबरच वऱ्हाडच्याहि भवितव्याच्या बाबतींत ही परिषद कणखर निर्णय देईल आणि मराठी जनतेला योग्य मार्गदर्शन करील, अशी मला खात्री वाटते. कारण वऱ्हाडच्या स्वातंत्र्यावर महाराष्ट्राचें अस्तित्व आणि एकीकरण अवलंबून आहे.

म्हणून या आणिबाणीच्या वेळीं हें अधिवेशन घटनासमितीच्या मराठी सदस्यांना योग्य आदेश देईल, अशी मला अपेक्षा आहे.

आपला

प्र. ल. भोंसले

संदेशवाचनानंतर श्री. पाटसकर यांनी श्री. शंकरराव देव यांना अध्यक्ष स्थान स्वीकारण्याची विनंति करून पुष्पहार घातला. नंतर श्री. देव यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची भूमिका विशद करणारें ओजस्वी आणि मुद्देसूद भाषण सुमारे तासभर केलें. त्या भाषणांतील महत्वाचा भाग पुढें दिला आहे:—

## श्री. शंकरराव देव यांचें भाषण

" संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधींचे हें पहिले अधिवेशन आज जळगांव येथें भरत आहे. हिंदुस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व सलग प्रदेशाचा एक संयुक्त प्रांत बनविणें हा या परिषदेचा उद्देश आहे.

### मुंबई शहर हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक

ब्रिटिश अंमलाखालील दोन प्रांतांत मराठी भाषा बोलणारांचे विभाग आज वाटले गेलेले आहेत. नागपूर प्रांताचे चार जिल्हे, वऱ्हाडचे चार जिल्हे व मुंबई प्रांतातील दहा जिल्हे मिळून मराठीभाषी भाग दोन प्रांतात आज वाटले गेलेले आहेत. मुंबई प्रांतांतील दहा जिल्हे असा जेव्हां उल्लेख करण्यांत येतो, तेव्हां त्या दहा जिल्ह्यांत मुंबई शहराचा समावेश होतो, असेंच वस्तुतः समजण्यांत आलें पाहिजे. परंतु, मुंबई शहराचा प्रश्न डावलण्यांत येतो, असा कांहीं जणांकडून आक्षेप घेण्यांत येत आहे. संयुक्त महाराष्ट्रांत मुंबई शहराचा अंतर्भाव झाला पाहिजे, हें स्पष्ट आहे. मुंबई शहर हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे, याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं.

### संस्थानांतील मराठी विभाग

कोल्हापूर, दक्षिण महाराष्ट्रांतील इतर संस्थानें आणि निजाम राज्यांतील मराठी विभाग म्हणजे मराठवाडा यांचा प्रश्न विचारांत घेण्याच्या वेळीं एकंदर

संस्थानांचा प्रश्न उभा राहतो. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्याच्या आजच्या प्रयत्नांत या विभागांचा अंतर्भाव आज व्यवहार्य नाहीं. परंतु एक काळ असा येईल कीं, ज्या वेळीं आम्हांला संयुक्त महाराष्ट्रांत संस्थानांतील सर्व सलग मराठी विभागांचा अंतर्भाव करतां येईल. त्यांना बाहेर ठेवण्याचा आमचा उद्देश नाहीं, हें या विभागांतील मराठी जनतेनें अवश्य ध्यानांत ठेवावें. सध्यांच्या परिस्थितीमुळें पडलेल्या मर्यादांमुळेंच खरोखरी आम्ही संस्थानी विभागांविषयीं आज निश्चित बोलूं शकत नाहीं, एवढेंच. ब्रिटिश हिंदुस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या विभागांचें संयुक्तीकरण हें संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें तात्कालिक म्हणजे नजीकचें ध्येय आहे.

## गोमंतकाचें भवितव्य

ज्या विभागाला ब्रिटिश हिंदुस्थानाचा किंवा संस्थानांचाहि विभाग आपण म्हणूं शकत नाहीं, असा परसत्तेखालीं असणारा गोमंतक हा मराठी विभाग आहे. हिंदुस्थान परकीय सत्तेखालीं नसावा असें आम्ही म्हणतो, त्या वेळीं हिंदुस्थानाच्या कोणत्याहि विभागावर ब्रिटिशांप्रमाणेंच फ्रेंच, पोर्तुगीज इत्यादि परकीयांची रतिभरही सत्ता नसावी, असा आमच्या म्हणण्याचा अर्थ आहे. पोर्तुगीज सत्तेखालील गोमंतकाला पारतंत्र्यांतून मुक्त करून त्याचा संयुक्त महाराष्ट्रांत अंतर्भाव करणें, हेंही आमचे ध्येय आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील मराठी विभागांचें एकीकरण करणें म्हणजे इतर मराठी विभागांची उपेक्षा करणे नव्हे. योग्य वेळी त्या विभागांचाहि समावेश संयुक्त महाराष्ट्रांत करून घेण्यांत येणार आहे. आज पोर्तुगीज अमलाखाली असलेला गोमंतक, हिंदुस्थान स्वतंत्र होतांच, त्या परसत्तेच्या पाशांतून मुक्त होऊन संयुक्त महाराष्ट्रांत समाविष्ट केला जाईल.

## जंजिरा, जव्हार आणि सुरगणा

संस्थानांचा आम्ही विचार करतों त्या वेळी जंजिरा, जव्हार आणि सुरगणा या मराठीभाषी संस्थानांचा प्रश्न आपल्या समोर उभा राहतो. या संस्थानांचा समावेश गुजराती संस्थानांच्या गटांत केला जाणें हे गैर आहे, असें संयुक्त महाराष्ट्राच्या वतीनें मी जाहीर करतों. हीं मराठीभाषी संस्थानें संयुक्त महाराष्ट्रांतील दक्षिणी संस्थानांच्या संघांत सामिल झालीं पाहिजेत.

## घरगुती अडचणी आपणच दूर केल्या पाहिजेत

स्वतंत्र हिंदुस्थानाची घटना संघराज्याची होणार आहे, हें आतां निश्चित आहे. अखंड हिंदुस्थान मानून मुद्दां अनेक राज्यांचा हा बहुजिनसी संघ होणार आहे. या संघराज्यांत भाषा आणि संस्कृति यांचे भेद लक्षांत घेऊन प्रांतांची संपूर्ण स्वायत्तता काँग्रेसनें मान्य केली आहे. संघराज्याची घटना तयार करतांना, आजची प्रांतरचना मान्य नाहीं, अशी काँग्रेसची भूमिका आहे. भाषा, संस्कृति आणि समाज या तिन्ही दृष्टींनी एकजिनसी असाच संघराज्याचा प्रत्येक घटक असला पाहिजे. हल्लींचे सदोष प्रांत बदलवून टाकून प्रांतांचा विकास करण्यासाठी भाषिक व सांस्कृतिक पायावर प्रांतांची उभारणी झाली पाहिजे. म्हणूनच आम्हाला मराठी बोलणाऱ्यांचा एक प्रांत हवा आहे. असा एक प्रांत बनवितांना ज्या अडचणी येतील असें दिसतें, त्या घरांतल्या आहेत. या घरगुती अडचणी आपणच दूर केल्या पाहिजेत. आज स्वतंत्र हिंदी संघराज्याची घटना तयार होत आहे. त्या वेळीं मराठी भाषा बोलणारांचा एक घटक निर्माण झालाच पाहिजे, असा निर्धार या संक्रमणाच्या वेळी प्रकट करण्यासाठीं आपण आज एकत्र जमलों आहोत.

## सर मिर्झा इस्माइल यांचें आव्हान

ब्रिटिश सत्ता जाऊन आपल्या हातीं संपूर्ण सत्ता येणार त्या वेळीं कोणाच्या हातीं किती सत्ता देण्यांत येईल, हा एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवला आहे. ब्रिटिशांना सार्वभौमत्व ज्यांच्याकडून प्राप्त झालें, त्यांच्याकडे ते पुन्हा परत देण्यांत येईल, असें ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें आहे. हिंदुस्थानांतील संस्थानांत सर्वांत मोठें जे निजाम–हैद्राबाद संस्थान, त्यापासून तों अगदी लहानांतल्या लहान संस्थानांना त्यांचें सार्वभौमत्व परत देण्याचें ब्रिटिशांनी ठरविलें आहे ! सार्वभौम सत्ता ज्याची त्याला परत मिळणार असें गृहीत धरलें, तर संयुक्त महाराष्ट्रासमोर वऱ्हाडचा प्रश्न प्रामुख्यानें उत्पन्न होतो. वऱ्हाडचे चार जिल्हे आमचे असून आम्हांला ते परत मिळाले पाहिजेत, असें निजाम सरकारचें म्हणणें आहे. वऱ्हाडचे चार जिल्हे हे निजामाच्या राज्याचे अंगभूत भाग आहेत, असें विधान सर मिर्झा इस्माइल यांनीं नुकतेंच आपल्या वऱ्हाडच्या दौऱ्यांत केलें. वऱ्हाडांत आमचें निशाण, आमचा कायदा आणि

आमचें राज्य सुरू झालें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. सर मिर्झा इस्माइल यांनीं आपल्याला, विशेषतः सर्व संयुक्त महाराष्ट्राला, हें एक प्रकारचें आव्हानच दिलें आहे, असें मी समजतो.

## आव्हानाला पहिलें आणि शेवटचें उत्तर

निजामाच्या या आव्हानाला माझें पहिले व शेवटचे असें एकच उत्तर आहे. मी आग्रही व हट्टी आहे, असा कित्येकांचा माझ्यावर आरोप आहे. तो पत्करूनही मी निजामांना असें उत्तर देतो कीं, "वऱ्हाड आमचा म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचा आहे." आम्हीं असें जाहीर करतो कीं, वऱ्हाड हा आमचा आहे; संयुक्त महाराष्ट्राचा तो अवयव आहे; हिंदी जनतेच्या हातीं सत्ता आल्यावर जे हिंदी संघराज्य त्या सत्तासंक्रमणानंतर उदय पावणार, त्या सार्वभौम हिंदी संघराज्याचा वऱ्हाड हा अंगभूत भाग आणि अविभाज्य घटक आहे. घटनासमितींत वऱ्हाडला ब्रिटिश सरकारनें स्वतंत्र प्रतिनिधित्व दिलें, त्याचा अर्थच हा कीं, वऱ्हाड हा निझाम राज्यांत गणला जात नसून, त्याचा दर्जा आणि स्थान अगदीं स्वतंत्र आहे ! सर मिर्झा यांनीं जे आव्हान मराठी जनतेला दिलें आहे, त्याचें योग्य उत्तर त्यांना शक्य त्या सर्व मार्गांनी दिलें जाईल. वऱ्हाडच्या स्वातंत्र्याकरितां निझामशी लढण्याचाच केवळ नव्हे, तर इंग्रजांशीं लढण्याचा जरी प्रसंग आला, तरी तशी तयारी महाराष्ट्रीय जनतेनें ठेवली पाहिजे. निजामाच्या आव्हानाला आमच्या जवळ याशिवाय दुसरें उत्तर नाहीं. पण हें उत्तर देतांना 'उत्तर बहु बायकांत बडबडला' असें होणार नाहीं, याची आपण काळजी घेतली पाहिजे. आपलें उत्तर लेचेंपेचें नसलें पाहिजे. वऱ्हाड हा निजामच्या राज्याचा एक भाग कदापि होणार नाहीं, तो संयुक्त महाराष्ट्राचाच भाग होईल, असा आपला पक्का निश्चय आहे. वऱ्हाडच्या प्रश्नावर रणें माजणार आहेत. या रणांत आपण वीर ठरलें पाहिजे. प्रसंग पडला, तर लढून वऱ्हाड संयुक्त महाराष्ट्रांतच ठेवणार, असा आमचा निर्धार आहे.

## वऱ्हाडचा प्रश्न डावलणार नाहीं

ब्रिटिश त्रिमंत्री योजनेनुसार जी घटनासमिती जन्मास आली, तींत वऱ्हाडचे प्रतिनिधी बसून आज स्वतंत्र हिंदुस्थानची घटना बनवीत आहेत.

अशा स्थितींत हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर वऱ्हाडचे प्रतिनिधी निजामाकडे कसे जाणार ? वऱ्हाडच्या प्रश्नावर इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आला, तरी लढण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. वऱ्हाडचा प्रश्न कॉंग्रेस डावलणार असा कित्येकांचा आक्षेप आहे. कांग्रेसच्या दडपणामुळें मी आपल्या मनांत असलेल्या गोष्टी बोलत नाहीं व बोललो तरी त्या करण्याचें टाळतों, असा माझ्यावरहि आरोप करण्यांत येत असतो. जो मनुष्य संघांत नसतो, त्याला संघाचा संयम व शिस्त ही गुलामी होय, असें वाटत असतें. वऱ्हाडचा प्रश्न कॉंग्रेस डावलील, असे या लोकांना वाटत आहे. ही त्यांची शंका फोल आहे. कांहीं लोकांना पुष्कळ बोलावयाला हवे असतें. पुष्कळ बोलणाऱ्यांच्या मनांत कांही नसतें; व ज्यांच्या मनांत पुष्कळ असतें, ते थोडे बोलतात. हे सर्व आक्षेप लक्षांत घेऊन मुंबई शहर आणि वऱ्हाड यासंबंधीची माझी भूमिका मी आज मुद्दाम स्पष्ट केली आहे.

## हे घरांतले शत्रु सांभाळा

महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या आड आतां बाहेरचा कोणीहि शत्रु राहिला नाहीं. घरांतलेच शत्रु आतां एकीकरणाच्या आड येणार आहेत. एकाच घरांत रहावें असें बाहेर म्हणून प्रत्यक्ष एका घरांत राहण्याची ज्यांची इच्छा नाही, तेच लोक महाराष्ट्राचे शत्रु होत. गोव्यापासून नागपूरपर्यंत एक मराठी प्रांत एक वर्षाच्या आंत निर्माण करण्याचा आपण दृढ निश्चय केला पाहिजे. नागपूर, वऱ्हाड आणि मुंबई या प्रांतांतील मराठी जनतेनें आम्ही संयुक्त महाराष्ट्र एक वर्षांत बनवूं असा निश्चय केला, तर तीन कोटी मराठी जनतेच्या या निश्चयाच्या आड कोणीहि येऊं शकणार नाहीं. पण आपल्या या निश्चयांत कोणत्याहि तऱ्हेचे राखीव कप्पे मात्र ठेवूं नका.

## एक लाख लोकांची मागणी

अशी संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याची तळमळ मनाला लावून घेऊन ती सफल करण्यासाठीं मजबूत संघटना निर्माण केली पाहिजे; व त्यासाठीं परिषदेचे जास्तींत जास्त सदस्य नोंदविण्यांत आले पाहिजेत. पूर्वी आपण दहा हजार सदस्य नोंदविण्याचा संकल्प केला होता; व तेरा हजार सदस्य

नोंदले गेले. आतां तीन कोटी महाराष्ट्रीय जनतेंतून येत्या तीन महिन्यांत एक लक्ष सदस्य नोंदले गेले पाहिजेत. महाराष्ट्र एकीकरणाच्या मागणीच्या मागें एक लक्ष लोकांचा सक्रिय पाठिंबा आहे, असें जगाच्या प्रत्ययाला आलें पाहिजे; व या मागणीच्या मागें एक लक्ष लोकांचा दृढ निश्चय आहे, असें मला म्हणतां आलें पाहिजे. परिषदेची पाळेंमुळें खोलवर गेली आहेत आणि ती बलशाली झाली आहे, हें दाखविण्यासाठीं एक लक्ष सदस्यांची नोंद झाली पाहिजे, असें मला वाटतें.

### परभाषीयांस अभयवचन

संयुक्त महाराष्ट्रांत ज्यांची मातृभाषा मराठी नाही त्यांना त्यांच्या योग्य आणि न्याय्य हक्कांचें संरक्षण दिलें जाईल; व त्यांना संपूर्ण नागरिकत्व मिळेल. पण त्यांनी मात्र सांघिक लोकहिताचें म्हणजे महाराष्ट्रांत राहिल्यावर त्याच्या हितसंबंधांशीं एकनिष्ठ राहण्याचें धोरण अंगीकारिलें पाहिजे, असें त्यांना सांगणें मला अवश्य वाटतें."

## श्री. गाडगीळ यांचें भाषण

अशा आशयाचें श्री. शंकरराव देव यांचें भाषण झाल्यानंतर त्यांनीं श्री. न. वि. गाडगीळ यांना भाषण करण्याची विनंती केली. श्री. गाडगीळ आपल्या भाषणांत म्हणाले, "हिंदी संघराज्याची जी घटना आज दिल्ली येथें घटनासमितींत तयार केली जात आहे, ती घटना तडकाफडकीं तयार होऊन अंमलांत येईल, असें लोकांनीं समजूं नये. अशा प्रकारची घाईघाईनें तयार केलेली घटना अखेर कदाचित् पश्चात्तापाला कारण होईल, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. विशेषतः, जेथें संघराज्याचें मध्यवर्ती सरकार आणि त्याचे घटक यांच्या अधिकारांचा समतोल अत्यंत सूक्ष्मतेनें आणि सुसंगतपणानें सांभाळून दोहोंची बेमालूम सांगड घालावयाची असते, तेथें घटकांची रचना करतांना थोडी जरी चूक झाली, तरी तिच्यामुळें सर्व घडी विघडून जाण्याचा संभव असतो. घटना-समितींत घटनापंडित हे संघराज्याच्या घटनेचा तपशील घांसूनपुसून निश्चित करीत असतांना प्रांतांची रचना पायाशुद्ध तत्वावर करण्यांत आली पाहिजे. तात्पुरत्या सरकारनें फक्त कायदा आणि शांतता यांची अंमलबजावणी संक्रमण-काळांत योग्य रीतीनें केली आहे, एवढ्यावरच लोकांनीं समाधान मानलें पाहिजे.

संक्रमणाच्या प्रक्षुब्ध काळांत जी आश्वासनें पूर्ण करतां येणें शक्य नाहीं, ती मोठमोठ्या सुधारणांची आश्वासनें तात्पुरत्या सरकारनें देऊं नयेत, हेंच इष्ट होय."

## प्रतिनिधिसभेचें अधिवेशन

### वऱ्हाडच्या प्रश्नावरील चर्चा

ता. १३ रोजीं रात्रीं विदर्भ प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष ना. ब्रिजलालजी बियाणी, डॉ. पंजाबराव देशमुख आणि सौ. प्रमिला ओक ही मंडळी जळगांवास येऊन पोंचली. ता. १४ रोजीं सकाळीं अधिवेशनाला श्री. देव यांच्या अध्यक्षतेलाली सुरुवात झाली. वऱ्हाडांतील सर्व पक्षांचे नेते या वेळीं हजर होते; व वऱ्हाडच्याच प्रश्नावर प्रामुख्यानें चर्चा झाली. प्रथम श्री. ध. रा. गाडगीळ यांनीं वऱ्हाडसंबंधीच्या ठरावाचा जो मसुदा तयार केला होता, तो ना. बियाणी आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांना वाचून दाखविण्यांत आला; व श्री. देव यांनीं वऱ्हाडच्या बाबतींतील परिषदेची भूमिका आणि परिषदेच्या मार्फतच वऱ्हाडच्या प्रश्नाचा निर्णय लावून घेण्याची आवश्यकता उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन केली. त्यानंतर प्रो. पोतदार यांनीहि असें स्पष्ट सांगितलें कीं, "वऱ्हाडच्या प्रश्नासंबंधीं जी काय निवेदनें व्हावयाचीं ती संयुक्त महाराष्ट्र परिषदेमार्फतच झाली पाहिजेत. स्वतंत्र रीतीनें निवेदनें किंवा वाटाघाटी होणें धोक्याचें आहे. वऱ्हाडचा प्रश्न हा त्याचे नेते समजतात त्याप्रमाणें एकट्या वऱ्हाडचा नसून सर्व महाराष्ट्राचा आहे. म्हणून वऱ्हाडनें या बाबतींत स्वतंत्रपणानें कोणतीहि गोष्ट करतां कामा नये." श्री. देव आणि प्रो. पोतदार यांनीं उपस्थित केलेल्या या महत्त्वाच्या मुद्यावर बरीच चर्चा होऊन शेवटीं डॉ. पंजाबराव देशमुख यांनीं, ना. बियाणी आणि श्री. रामराव देशमुख यांच्याशीं सहविचार करून, श्री. ध. रा गाडगीळ यांनीं तयार केलेल्या ठरावाला नवीन 'प्रस्तावना' (Preamble) सुचविली. त्यांनीं सुचविलेल्या या प्रस्तावनेचा मसुदा पुढें दिला आहे:—

In view of the reported attempts of the Naizam's Government regarding retrocession of Berar and the latest statements and speeches that are being made on their behalf in this

connection which in the opinion of this conference constitute a threat, however slender, to the future position of Berar as a part of Free India as well as to the integrity and work of the Constituent Assembly, this conference resolves that:

## मुंबई शहराचा अंतर्भाव

या बैठकींतील दुसरा चर्चेचा मुद्दा मुंबई शहराचा अंतर्भाव संयुक्त महाराष्ट्रांत होतो हें स्पष्ट करण्यासाठीं स्वतंत्र ठराव करण्यासंबंधींचा होता. या मुद्यासंबंधींचा प्रतिनिधींचा आग्रह लक्षांत घेऊन श्री. ग. रा. गाडगीळ यांनीं मुंबईसंबंधी स्वतंत्र ठरावाचा मसुदा तयार केला होता. ना. बियाणी यांनीं या ठरावांत सुचविलेली दुरुस्ती मान्य करण्यांत येऊन या ठरावाचा मसुदा पक्का करण्यांत आला. हा ठराव पुढें दिला आहे:—

In view of doubts that have been expressed in certain quarters regarding the position of Bombay City in the reformation of linguistic provinces the Conference reasserts the fact that Bombay City forms on geogrphic, historical, ethnological and other grounds a part of Konkan and indissolubly an integral portion of the territory of the Marathispeeking people. It denies emphatically the claim that because under the British the City has attracted to it many elements of population from outside Maharashtra, the City could thereby cease to be a part of the country of the Marhattas or that it could be cut off from the rest of Maharashtra on that ground

या मसुद्याचाही, घटनेंतील दुरुस्ती-पुस्तीच्या चर्चेच्या वेळीं, पुन्हा विचार होऊन संयुक्त महाराष्ट्राच्या उद्देशपत्रिकेंत मुंबई शहराचा स्पष्ट निर्देश करावा आणि हा स्वतंत्र ठराव गाळावा, असें ठरलें.

## घटनेंतील दुरुस्त्या

दुपारीं ३॥ वा पुन्हा प्रतिनिधिसभेच्या अधिवेशनाला सुरुवात झाली; व डॉ. पंजाबराव देशमुख यांनीं ना. बियाणी यांच्या सहविचारानें तयार केलेला वऱ्हाडसंबंधीच्या ठरावाचा मसुदा मान्य करण्यांत आला. नंतर घटनेंतील दुरुस्त्यांसंबंधी चर्चा सुरू झाली. पुरवणी निवडणूक आणि तदनंतर कार्यकारी

मंडळाच्या सदस्यांची निवडणूक यासंबंधी कार्यकारी मंडळानें जरूर ते नियम करावेत, असें ठरलें. त्याचप्रमाणें, केंद्र कचेरीचें स्थानहि कार्यकारी मंडळानें निश्चित करावें, अशी दुरुस्ती घटनेंत करण्यांत आली. नंतर श्री. शंकरराव देव यांच्या सूचनेनुसार म. म. प्रो. पोतदार यांनीं तात्पुरत्या सरकारच्या स्थापनेसंबंधीं तयार केलेला ठराव मंजूर करण्यांत आला.

## खुलें अधिवेशन

सायंकाळीं ६ वा. नगरभवनाच्या पटांगणांत खुल्या अधिवेशनाला श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखालीं सुरुवात झाली. या अधिवेशनाचा उद्देश प्रतिनिधिसभेनें मंजूर केलेले ठराव लोकांना विशद करून सांगण्याचाच मुख्यत: होता; व तो उद्देश महत्वाच्या ठरावांवर परिषदेला आलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांची विवेचक भाषणें झाल्यामुळें उत्कृष्ट रीतीनें तडीस गेला. प्रथम अध्यक्षांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाचा ठराव वाचून दाखविला. या ठरावांत मुंबई शहराचा संयुक्त महाराष्ट्रांत अंतर्भाव होतो असा स्पष्ट निर्देश केलेला असून, त्याबरोबरच मुंबई कायदेमंडळानें नुकत्याच मंजूर केलेल्या भाषावार प्रांतरचनेसंबंधीच्या ठरावाविषयी समाधान व्यक्त केलें होतें.

### जव्हार, जंजिरा आणि सुरगणा

नंतर जव्हार जंजिरा, आणि सुरगणा या मराठी संस्थानांचा समावेश गुजराथी संस्थानांच्या गटांत करण्यांत आल्याबद्दल नापसंती दर्शविणाऱ्या ठरावावर सांगलीचे श्री. का. ह. खाडिलकर आणि जंजिऱ्याचे श्री. कर्णिक यांची भाषणें झाली. श्री. कर्णिक यांनीं आपल्या भाषणांत, जंजिरा संस्थानांतील काळ्या बाजाराची माहिती देऊन, ही तीनही संस्थानें गुजराथी संस्थानांच्या गटांत सामील केल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची कल्पना दिली.

### परप्रांतीयांना संरक्षण

जे परप्रांतीय किंवा परभाषीय लोक संयुक्त महाराष्ट्रांत स्थायिक झालेले आहेत, त्यांना अभयवचन आणि नागरिकत्वाचे हक्क देण्याची घोषणा करणारा

ठराव महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष श्री. केशवराव जेधे यांनी विशद केला. श्री. जेधे म्हणाले, " महाराष्ट्रांत व्यापारधंदा किंवा सावकारी करून ज्यांनी संपत्ती मिळविली आहे, त्यांची ती संपत्ती महाराष्ट्राचीच आहे. ती सारी संपत्ती महाराष्ट्रभूमींतच राहिली पाहिजे आणि महाराष्ट्राच्या ऊर्जितासाठींच खर्ची पडली पाहिजे. मराठी बहुजनसमाजाला पिळून काढून जे आज पैसा कमावित आहेत किंवा काळा बाजार माजवून जे जनतेची लूट करीत आहेत, त्यांना अर्थातच हें अभयवचन लागू पडत नाहीं. मग ते कोणत्याहि धर्माचे, जातीचे वा भाषेचे असोत ! ब्राम्हणापासून महारा-पर्यंत मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मी ' मराठा ' समजतों. महाराष्ट्राच्या इमानाला जो जागेल, त्याच्या हितसंबंधांना जो जपेल तो मराठा, तो महाराष्ट्रीय; —मग त्याचा धर्म, जात किंवा भाषा कोणतीहि असो. परप्रांतांतून महाराष्ट्रांत आलेले व्यापारी, भांडवलवाले, सावकार वगैरे वर्ग आज मराठी बहुजनसमाजाचें शोषण करीत आहेत; व येथील भूमींतून पिळून काढलेली संपत्ती परप्रांतीं पाठवीत आहेत. हा प्रकार मात्र यापुढें आम्ही चालू देणार नाहीं. "

## महाराष्ट्रीय मुसलमानांना विनंती

अमळनेरचे श्री. युसुफखान पठाण म्हणाले, " महाराष्ट्रांत राहणारा मुस्लिम समाज हा गरीब आणि अशिक्षित आहे. त्याला ज्या महाराष्ट्रांत तो रहातो, त्याच्या जीवनाशीं आणि साहित्याशीं अद्याप समरस होतां आलेलें नाहीं. मुस्लिम समाजाचें स्वतःचें मराठी साहित्य निर्माण झाल्यास मराठी भाषेविषयीं मुस्लिम समाजांत आपलेपणा उत्पन्न होईल. महाराष्ट्र हीच आपली मायभूमि समजून महाराष्ट्रांतील मुसलमानांनीं तिच्याशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे."

## सीमा समितीची मागणी

यानंतर सरहद्दी निश्चित करण्यासाठीं कमिशन नेमण्याची मागणी करण्यासंबंधींच्या ठरावावर बेळगांवचे डॉ. गो. धा. कोवाडकर यांचें भाषण झालें. ते म्हणाले, " बेळगांव जिल्ह्याचा समावेश कर्नाटकांत होतो अशा समजुतीनें आज त्या जिल्ह्यांतील मराठी जनतेची हेळसांड चाललेली आहे.

सुमारें दीडशें मराठी खेडीं दळी धरणांत गडप होऊन जाणार आहेत. परिषदेनें बेळगांव–कारवारच्या प्रश्नाकडे तत्परतेनें लक्ष दिलें पाहिजे. ”

## मराठी प्रदेश महाकोसलमध्यें घातला

या ठरावावर गोंदियाचे श्री. पूरणमल रहांगदाळे यांचेंही भाषण झालें. ते म्हणाले, “ भंडारा जिल्ह्यांतील ज्या गोंदिया तहसिलींतून मी आलों आहे, त्या तहसिलीवर आज हिंदी लोक आपला हक्क सांगत आहेत. त्याचप्रमाणें बालाघाट, बैतूल, छिंदवाडा आणि नेमाड या जिल्ह्यांतील बराच मराठीभाषी भाग आज महाकोसलच्या हिंदी जिल्ह्यांत घातला गेला आहे. रामपायलीचा मराठी परगणा पूर्वी गोंदिया तहसिलींत होता. पण एका रात्रींत तो हिंदी विभागाला जोडण्यांत आला. अशा प्रकारच्या अन्यायांचा निकाल सीमा कमिशन नेमण्यांत आल्याशिवाय कायमचा लागणार नाहीं. ”

## वऱ्हाडवरील निजाम सरकारचें आक्रमण

नंतर वऱ्हाडसंबंधींचा ठराव विदर्भ प्रांतिक कांग्रेसचे अध्यक्ष ना. ब्रिजलालजी बियाणी यांनीं वाचून दाखविला. ते म्हणाले, “ या ठरावावर महाराष्ट्रीय आणि वऱ्हाडी अशा दोन्ही नात्यांनीं मी बोलत असून, वऱ्हाड निजाम-सरकारच्या तावडींतून मुक्त झाला, तरच संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत येईल, असें मला वाटतें. निजामाला वऱ्हाडवर हक्क सांगावयाला कांहींहि आधार नाहीं. स्वतःच्या संरक्षणासाठीं जेव्हां निजामनें वऱ्हाड ब्रिटिश सरकारकडे गहाण टाकला, तेव्हांच त्याचा वऱ्हाडवरील हक्क संपला. वऱ्हाडवर वऱ्हाडच्या जनतेचेंच स्वामित्व आहे; व तें आम्ही कोणालाहि हिरावूं देणार नाहीं. जगामध्यें कोणत्याहि देशावर एकच निशाण फडकत असतें. पण वऱ्हाडवर आज तीन निशाणें फडकत आहेत. ब्रिटिशांच्या मनांत कांहींही असो, १९४८ सालीं जेव्हां जुने करारमदार रद्द होतील, तेव्हां ब्रिटिशांचे तांबडें निशाण जसें वऱ्हाडांतून निघून जाईल, तसेंच त्याबरोबर आलेलें निजामाचे पिवळें निशाणही निघून जाईल, हें निश्चित. वऱ्हाडवर १९४८ नंतर फक्त तिरंगी राष्ट्रीय झेंडाच फडकत राहील. १९३६ सालीं ब्रिटिश आणि निजाम यांच्यांत जो करार झाला, त्याला वऱ्हाडच्या जनतेनें कधींच मान्यता दिली नव्हती. म्हणून तो

करार आणि त्यांतून उत्पन्न होणारी बंधने वऱ्हाडच्या जनतेला मुळींच लागूं होत नाहींत. घटनासमितीनें जनतेच्या सार्वभौमत्वाची घोषणा केली आहे. त्यामुळें वऱ्हाडच्या प्रश्नावर महाराष्ट्रच काय, पण सर्व हिंदुस्थान वऱ्हाडला साथ देईल, याबद्दल शंका नाहीं. वऱ्हाड नष्ट झाला तरी चालेल, पण संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत आलाच पाहिजे."

## फक्त कांग्रेसच विरोध करूं शकेल

नंतर 'उदय' चे संपादक श्री. ना. रा. बामणगांवकर म्हणाले, "राष्ट्र-सभेची गेल्या साठ वर्षांची परंपरा वऱ्हाडला पाठिंबा देणारी आहे. निजामाच्या आक्रमक मागणीला प्रभावी आणि परिणामकारक विरोध फक्त कांग्रेस संस्थाच करूं शकेल."

## स्वतःला 'राष्ट्र' म्हणविण्याचा महाराष्ट्राचा हक्क

नंतर डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्राची स्थापना ही खरोखरी वऱ्हाडच्या भवितव्यावर अवलंबून आहे. वऱ्हाड जर निजामच्या राज्यांत परत गेला, तर संयुक्त महाराष्ट्र कसा निर्माण होणार? वऱ्हाड निजामी सत्तेच्या पाशांत पुन्हा अडकल्यास नागपूर प्रांत एकीकडे लोंबकळत राहील आणि आजचा दहा जिल्ह्यांचा महाराष्ट्र एवढाच काय तो शिल्लक राहिल. संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याची जी घोषणा आपण आज करीत आहोंत, ती अत्यंत महत्वाची आहे. आज प्रत्येक प्रांत 'स्वतंत्र राष्ट्र' होण्याची भाषा बोलत असून, सिंधसारखा लहानसा प्रांतसुद्धां स्वतंत्र होण्याचा हक्क सांगत आहे. पण, हिंदुस्थानांत स्वतंत्र आणि सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून नांदण्याचा हक्क जर कोणत्या एका प्रांताला असेल, तर तो महाराष्ट्राला आणि मराठी लोकांनाच आहे, असें म्हणावयाला मला यत्किंचितही शंका वाटत नाहीं. कारण, तीनशें वर्षांपूर्वी मराठ्यांनीं हिंदुस्थानांत स्वतःचें राज्य आणि साम्राज्य स्थापन करून आपल्या पराक्रमी अस्तित्वाची चमक सर्व जगाला दाखवून दिली. म्हणून इतिहासाच्या दृष्टीनें महाराष्ट्रीयांनाच 'राष्ट्र' म्हणवून घेण्याचा हक्क पोंचतो. निजाम सरकार वऱ्हाडवर स्वारी करणार असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांतून फडकल्या आहेत. पण, निजामानें जर खरोखरीच

वऱ्हाडवर स्वारी केली, तर सर्व हिंदुस्थानाशीं त्याला लढावें लागणार आहे, याची जाणीव त्याला नसेल, असें मला वाटत नाहीं. वऱ्हाडचा प्रश्न हा 'बड्या राजकीय धोरणा'चा, ( High policy ) प्रश्न आहे. तो कश्या रीतीनें सुटेल हें आज निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि, वऱ्हाडच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याचा आपला निर्धार कायम असून, तो या ठरावाच्या रूपानें आपण जाहीर करित आहोंत. "

## निजामाची स्वारी होणें शक्य आहे

श्री. दादासाहेब सोमण म्हणाले, "निजाम वऱ्हाडवर स्वारी करून कब्जा करण्याचा प्रयत्न करील, असें मला प्रामाणिकपणानें वाटतें. मे. ॲटली यांच्या घोषणेंतच या स्वारीचें बीज आहे असें मी समजतों. श्री. जिना हे मुसलमानांसाठीं स्वतंत्र घटनासमिति मागत आहेत. त्या मागणीचा अर्थ उघड आहे. इंग्रज हिंदुस्थान सोडून गेल्यावर देशांत जी अराजकता माजेल तिचा फायदा घेतल्याशिवाय निजाम राहणार नाहीं, असें स्पष्ट दिसतें. वऱ्हाडचा पाकिस्तानांत समावेश होऊं न देण्यासाठीं जरूर तो सर्व लढा आणि त्याग करण्याची तयारी वऱ्हाडच्या जनतेने केली पाहिजे."

## वऱ्हाडचें शोषण होतां कामा नये

अकोला येथील 'मातृभूमी'च्या संपादिका सौ. प्रमिला ओक म्हणाल्या, "वऱ्हाडच्या जनतेचें शोषण होणार नाहीं अशा रीतीने जर संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण झाला, तर वऱ्हाडांतील भगिनींचा त्याला पाठिंबा राहील. वऱ्हाडची चाळीस लक्ष जनता जी राज्यपद्धति पसंत करील, तीच अंमलांत आणली गेली पाहिजे; व संयुक्त महाराष्ट्रानें तिलाच संमति दिली पाहिजे."

## नागपूर प्रांताचें भवितव्य

वर्ध्याचे वकील श्री. भा. वि. शेंडे म्हणाले, "वऱ्हाडच्या भवितव्यावर नागपूर प्रांताचें भवितव्य अवलंबून असल्यामुळें आज आमचे डोळे वऱ्हाडच्या प्रश्नाकडे लागले आहेत. वऱ्हाड जर परत निजामाला देण्यांत आला, तर चार जिल्ह्यांच्या नागपूर प्रांताची काय गती होईल, हें सांगणें मोठ कठीण आहे. संयुक्त महाराष्ट्राऐवजी एखादे वेळीं महाकोशलमध्येंच कायमचें सामील होण्याचा प्रसंग नागपूर प्रांतावर ओढवेल, असा संभव आहे. डॉ. पंजाबराव

देशमुख आणि ना. बियाणी यांनी वऱ्हाडसाठीं लढा करण्याची तयारी दाखवून संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला निस्संदिग्ध मान्यता दिली, याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो."

### अखिल महाराष्ट्राच्या पाठिंब्यानेंच हा प्रश्न सुटेल

श्री. दिगंबरराव बिंदु म्हणाले, "आज मराठवाड्यांतील जनतेचे डोळे वऱ्हाडच्या भवितव्याकडे लागले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेमुळें मराठवाड्यांतील जनतेला नवें बळ मिळणार असून अखिल महाराष्ट्राच्या पाठिंब्याच्या जोरावर मराठवाड्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटेल, अशी आम्हांला आशा वाटते."

### निजाम सरकारला स्पष्ट इशारा

नंतर 'केसरी'चे संपादक श्री. दा. वि. गोखले म्हणाले, "वऱ्हाड हा निजामच्या राज्याचा भाग नसून तो संयुक्त महाराष्ट्राचा अविभाज्य अवयव आहे, अशी स्पष्ट घोषणा या ठरावांत केली आहे. वऱ्हाड परत मिळविण्यासंबंधींच्या निजामाच्या सगळ्या कारस्थानांना परिषदेचें हें खणखणीत उत्तर आहे. एका काळीं जरी वऱ्हाड निजामच्या आधिपत्याखालीं असला, तरी ब्रिटिशांची सत्ता नष्ट झाल्यावर निजामाची सत्ता आपोआपच नष्ट होईल, हेंही या ठरावांत सूचित केलें आहे. इतकेंच नव्हे, तर ब्रिटिश लोक हिंदुस्थान सोडून जाण्यापूर्वी जर तुम्ही कांहीं गडबड कराल, तर वऱ्हाडांतील आणि अखिल महाराष्ट्रांतील जनता तें सहन करणार नाहीं, असेंही या ठरावाच्या रूपानें आपण निजामाला बजावलें आहे. ब्रिटिश सत्तेच्या प्रयाणाच्या संधीचा फायदा घेऊन संस्थानिक जर भलभलत्या उचापती आणि कारस्थानें करतील, तर त्यांचा निःपात झाल्याशिवाय राहणार नाहीं, हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. आज घटनासमिति स्वतंत्र हिंदी लोकराज्याची घटना तयार करीत आहे. व तिनें जनतेचा त्या त्या भूमिवरील हक्क मान्य केलेला आहे. अशा स्थितींत जर निजाम वऱ्हाडवर स्वारी करील, तर त्याच्याशीं घटनासमिति लढावयाला उभी राहील, याबद्दल मला शंका नाहीं."

शेवटीं ना. बियाणी यांनी पुन्हा छोटें भाषण केल्यावर प्रो. पोतदार यांनीं जळगांवच्या स्वागतमंडळाचे उत्कृष्ट व्यवस्थेबद्दल आभार मानले; व नंतर श्री. शंकरराव देव यांनीं अधिवेशन समाप्त झाल्याचें जाहीर केलें.

## अधिवेशनांत मंजूर झालेले ठराव

ता. १३ आणि १४ एप्रिल रोजीं जळगांव येथें भरलेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधिसभेच्या अधिवेशनांत पुढील ठराव एकमताने मंजूर करण्यांत आले:–

### ठराव पहिला

संयुक्त महाराष्ट्र परिषदेची जळगांव येथे भरलेली ही सभा जुलै १९४६ मध्ये मुम्बई शहरीं भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेमध्यें संमत झालेल्या महाराष्ट्र एकीकरणविषयक ठरावाची पुनर्घोषणा करीत आहे. या सभेचा असा दृढ अभिप्राय आहे कीं, भावी स्वतंत्र हिंदी संघराज्याचे संपूर्ण स्वायत्त घटक हे एकजिनसी व एकभाषी घटकच असले पाहिजेत. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करतां मुख्यत: मराठी भाषा बोलणाऱ्या सलग प्रदेशांतील म्हणजे मुंबई शहरासह मुंबई प्रांत आणि मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील मराठी भाषा बोलणारा प्रदेश एकाचराजकीय घटकामध्यें आणला पाहिजे. अशा तऱ्हेचा संयुक्त महाराष्ट्राचा घटक बनविणें हें घटनासमितीच्या कार्यांपैकीं अंगभूत कार्य असलें पाहिजे. याच दृष्टीनें मुंबई असेंब्लीनें नुकत्याच झालेल्या आपल्या अंदाजपत्रकी अधिवेशनामध्यें घटनासमितीनें हा प्रश्न लवकर हातांत घेण्याविषयीं जो ठराव मंजूर केला, त्याबद्दल या सभेला समाधान वाटत आहे.

### ठराव दुसरा

अन्य भाषा बोलणाऱ्या वेस्टर्न इन्डिया स्टेट्सच्या संघामध्यें जव्हार, जंजिरा आणि सुरगणा या मराठी संस्थानांचा अंतर्भाव करण्याची योजना करण्यांत येत आहे या गोष्टीचा ही सभा निषेध करीत असून दक्षिणी संस्थानांच्या संघामध्येंच त्यांचें स्वाभाविक स्थान आहे, असें या सभेचें मत आहे.

### ठराव तिसरा

कांहीं जणांकडून व्यक्त करण्यांत येणाऱ्या भीतीचें निवारण करण्यासाठीं ही सभा नि:संदिग्धपणें असें जाहीर करते कीं, एकजिनसी भाषावार प्रांतरचना

करतांना त्या प्रांतांत रहाणाऱ्या अन्य प्रांतांतील अथवा अन्य भाषा बोलणाऱ्या लोकांच्या वाजवी हक्कांस बाध येणार नाहीं. तसेंच, जात, मत, धर्म किंवा जन्मस्थान यांवर आधारलेला कोणताही पंक्तिप्रपंच करण्यांत येणार नाहीं. विशिष्ट तत्त्वावर प्रांतांची पुनर्रचना करण्याचें पर्यवसान म्हणून त्या प्रांतांत वसाहत करणाऱ्या कोणत्याही लोकांच्या गटाविरुद्ध किंवा कोणत्याही गटाचे बाजूनें भेदाभेद करण्याचें कारण असणार नाहीं किंवा उद्भवणार नाहीं किंवा तशी शक्यता नाहीं, असें ही सभा जाहीर करीत आहे.

## ठराव चौथा

(अ) या सभेचें असें मत आहे कीं, प्रांतांची पुनर्घटना करण्याची पूर्वतयारी म्हणून घटनासमितीनें भावी संघराज्यांतील घटकांच्या सीमा ठरवितांना कोणत्या तत्वांचा अवलंब करण्यांत यावा तीं तत्वें निश्चित करण्याचें काम तावडतोब हातीं घ्यावें.

(ब) घटनासमितीमध्यें असलेल्या संयुक्त महाराष्ट्रांतील प्रतिनिधींच्या मार्गदर्शनासाठी म्हणून ही सभा प्रांतिक सीमा ठरविणारीं तत्वें निश्चित करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला देत आहे.

(क) सीमाविषयक प्रश्नांची चांगली चौकशी करून संयुक्त महाराष्ट्राची कैफियत तयार करण्याचा अधिकार देखील ही सभा कार्यकारी मंडळाला देत आहे.

## ठराव पांचवा

वऱ्हाड प्रांत पुनः आपल्या राज्याला जोडण्याबाबत निजामसरकारकडून प्रयत्न चालू असल्याच्या बातम्या व त्यासंबंधीं निजाम सरकारच्या वतीनें अलीकडे करण्यांत आलेलीं निवेदनें व भाषणें याबद्दल या सभेचें असें मत आहे कीं, स्वतंत्र हिंदुस्थानचा एक घटक म्हणून होणाऱ्या वऱ्हाडच्या भावी दर्जास, तसेंच घटनासमितीच्या प्रतिष्ठेस व कार्यास यामुळें धक्का पोंचत आहे. म्हणून ही सभा असा ठराव करते कीं :—

(अ) वऱ्हाड हा ब्रिटिश हिंदुस्थानचा पुष्कळ दिवसांपासून एक भाग समजण्यांत येत असून ब्रिटिश हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतही त्याला तसें स्थान

मिळत आलें आहे व ब्रिटिश हिंदुस्थानाबरोबरच त्याची राजकीय प्रगतीही झालेली आहे. घटनासमितींत सध्यां वऱ्हाडचे प्रतिनिधि समाविष्ट असून ते सार्वभौम हिंदी संघराज्याची घटना तयार करण्यामध्यें भाग घेत आहेत. याच संघराज्याचा वऱ्हाड हा एक अंगभूत भाग होणार आहे. या त्याच्या भावी दर्जापासून वऱ्हाडला खालीं ओढण्याचा किंवा त्याच्यावर कोणत्याही प्रकारें निजामचें स्वामित्व लादण्याचा प्रयत्न झाल्यास वऱ्हाडची जनता त्याचा प्रतिकार करील.

(ब) या सभेची घटनासमितीला आणि ब्रिटिशांकडून सत्ता घेणाऱ्या तात्पुरत्या हिंदी सरकारला अशी विनंति आहे कीं, सत्तासंक्रमणाचे वेळीं हिंदी संघराज्याचा अंगभूत घटक म्हणून वऱ्हाडच्या दर्जाला कोणत्याही प्रकारें बाध येणार नाही, याबद्दल त्यांनीं दक्षता घ्यावी.

(क) वर निर्दिष्ट केलेल्या वऱ्हाडी जनतेच्या राजकीय भवितव्याला बाध येईल अशा तऱ्हेनें कोणताही करार किंवा अन्य प्रकारचें कृत्य जनतेवर बंधनकारक राहणार नाहीं आणि असला करार किंवा असलें कृत्य हिंदी संघराज्याच्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण करणारें होईल ही गोष्ट ही सभा ब्रिटिश सरकारच्या आणि निजाम सरकारच्या स्पष्टपणें नजरेस आणीत आहे.

## ठराव सहावा

ता. २० फेब्रुवारी १९४७ च्या ब्रिटिश सरकारच्या घोषणेमुळें जें सत्तांतर घडून येणार आहे, त्या वेळीं सत्तेचा स्वीकार करण्याची तयारी करणें आणि त्यासाठीं आवश्यक तें राज्ययंत्र उभारणें यासंबंधीची जी जबाबदारी जनतेवर आहे तिची जाणीव या सभेस आहे. म्हणून या कार्याकडे तावडतोब विशेष लक्ष देण्याची विनंती ही सभा घटनासमितीस करीत आहे.

तसेंच ही सभा घटनासमितीस आपला विचारपूर्वक ठरविलेला असा अभिप्रायही सादर करीत आहे कीं भावी सार्वभौम हिंदी संघराज्याची कायम स्वरूपाची घटना तयार करण्याच्या कामीं अनेक गुंतागुंतीचे प्रश्न व अडचणी उत्पन्न होणार असल्या, तरी त्यांची सोडवणूक करण्याचा सर्वोत्तम उपाय एकजिनसी व एकभाषी घटक बनविणें हाच होय.

---

## संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे उद्देश

ता. २८ जुलै १९४६ रोजी मुंबई येथें भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेच्या अधिवेशनांत मंजूर झालेला आणि जळगांव येथें ता. १२ एप्रिल १९४७ रोजीं भरलेल्या परिषदेच्या प्रतिनिधिसभेच्या अधिवेशनांत दुरुस्त झालेला मुख्य ठराव पुढें दिला आहेः—

[अ] हिंदुस्थानांत लोकशाही राज्यघटना यशस्वी करण्यासाठीं प्रांत रचना भाषावार करणें हेंच इष्ट आणि आवश्यक आहे असा या परिषदेचा विश्वास असल्यामुळें सर्व सलग मराठीभाषी प्रदेशाचा एक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करण्यांत यावा.

[आ] सध्यां या मराठी प्रदेशाचे पुढीलप्रमाणें तुटक विभाग पडलेले आहेतः—

(१) ब्रिटिश मुंबई प्रांतांतील मुंबई शहरासह मराठीभाषी भाग

(२) ब्रिटिश वऱ्हाड–मध्यप्रांतांतील मराठीभाषी भाग

(३) या दोन्ही भागांस भिडलेला हैद्राबाद वगैरे देशी संस्थानांतील मराठीभाषी भाग आणि

(४) पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतक

[इ] या तुटक विभागांपैकीं जेवढा विभाग आज साक्षात् ब्रिटिश सत्तेखालीं आहे, तेवढा तरी प्रथम अलग करून त्या सर्व विभागाचा एक मराठी प्रांत तावडतोब बनविण्यांत यावा आणि नंतर क्रमानें राहिलेले विभाग, साध्य होईल तसतसे, या मराठी प्रांतांत समाविष्ट करण्यांत यावेत.

हा ठराव हेंच परिषदेचे उद्देशपत्रक असून, परिषदेचे सदस्य होऊं इच्छिणाऱ्या व्यक्तींना त्याला संमती द्यावी लागते.

### परिषदेची वर्गणी

परिषदेच्या सदस्यत्वाची वर्गणी फक्त रु. १ ही आहे; व ती इयातींत फक्त एकदांच द्यावयाची असते.

# जंजिरा संस्थानाची कैफियत

जंजिरा संस्थान प्रजापरिषदेतर्फे पुढील कैफियत संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधिसभेला सादर करण्यांत आली आहे:—

१९४६ च्या जूनपर्यंत जंजिरा संस्थानाचा समावेश डेक्कन स्टेट्स एजन्सीमध्ये होत असे. त्यानंतर त्याचा अंतर्भाव गुजराथी स्टेट्स एजन्सीमध्ये करण्यांत आला. हा जो फेरबदल करण्यांत आला, त्याची कारणे लोकांना मुळीच माहित नाहींत.

जंजिरा संस्थान प्रजापरिषदेला गुजराथ स्टेट्स एजन्सीमध्ये जंजिरा संस्थान सामिल करण्यांत आले, ही गोष्ट मुळीच पसंत नाहीं. या अमान्यतेची कारणें पुढें दिली आहेत---

( १ ) मुंबई बेटाच्या दक्षिणेस कुलाबा जिल्ह्यांत चाळीस मैलांवर जंजिरा संस्थान आहे. त्याच्या उत्तरेस रेवदंडा, दक्षिणेस बाणकोट आणि पूर्वेस कुलाबा जिल्ह्यांतील माणगांव तालुका आहे. त्यावरून हें संस्थान कुलाबा आणि रत्नागिरी या दोन शुद्ध मराठी जिल्ह्यांच्या मधोमध असल्याचें म्हणजेच संपूर्णतः मराठी असल्याचें स्पष्ट दिसून येईल. गुजराथशीं त्याचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं.

( २ ) संस्थानांतील लोकांची भाषा मराठी आहे. इतकेंच नव्हे तर गेलीं ३०० वर्षें दरबारची भाषाहि मराठीच आहे. मुरुड, श्रीवर्धन आणि म्हसाळे या संस्थानच्या तीन तालुक्यांतील मराठी जनतेला गुजराथी भाषेचा गंधहि नाहीं.

( ३ ) सांस्कृतिक दृष्टया हें संस्थान शुद्ध मराठी असून, तें महाराष्ट्र भूमीचाच अंगभूत अवयव आहे.

कुलाबा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांत ज्या प्रकारचा जमिनधारा, सामाजिक जीवन, चालीरीती, राहणी, शेतीची पद्धति आहे, त्याच प्रकारची सर्व पद्धति जंजिरा संस्थानांतहि आहे. अर्थात् सर्व दृष्टींनी तें संस्थान महाराष्ट्रीय आहे.

गुजराथ स्टेट्स एजन्सीमध्ये त्या संस्थानाचा समावेश करण्याला फक्त एकच कारण दिसते. तें हें कीं, त्या संस्थानची छोटेखानी मांडलिक जहागीर जी जाफराबाद, ती काठेवाडच्या किनाऱ्यावर आहे. पण ह्या प्रश्नाचा विचार करतांना पुढील गोष्टी ध्यानांत घेतल्या पाहिजेत.:—

( १ ) जंजिरा संस्थानांत २५० खेडीं आहेत. जाफराबाद जहागिरींत फक्त १२ अगदी लहान खेडीं आहेत.

( २ ) जंजिरा संस्थानची लोकसंख्या सुमारे एक लक्ष आहे. जाफराबादची फक्त ११ हजार आहे.

( ३ ) संस्थानाचा जमीनमहसूल सुमारे १० लक्ष असून, जाफराबादचा जेमतेम १ लाख आहे.

( ४ ) जाफराबाद जंजिरा संस्थानापासून ४०० मैलांच्या अंतरावर आहे.

ह्यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं, गुजराथ स्टेट्स् एजन्सीमध्यें जंजिरा संस्थानाचा जो समावेश करण्यांत आला आहे, तो कोणत्याहि दृष्टीनें न्याय्य नाहीं. म्हणून, दक्षिणी संस्थानांच्या संघांत जंजिरा संस्थानाचा अंतर्भाव करण्यांत आला पाहिजे, अशी जंजिरा प्रजापरिषदेची मागणी आहे.

प्रकाशकः ग. त्र्यं. माडखोलकर, मुख्य कार्यवाह, सं. म. परिषद,
'तरुण भारत' कार्यालय, नागपूर
मुद्रकः क. वि. प्रयागी, बी. एस्सी.,
मॅनेजर, 'विजय' प्रिंटिंग प्रेस, महाल, नागपूर

# संयुक्त महाराष्ट्र परिषद

## परिषदेची घटना

मुंबईस ता. २८ जुलै १९४६ रोजीं भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेच्या पहिल्या अधिवेशनानंतर परिषदेच्या दुसऱ्या ठरावानुसार स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या तात्पुरत्या समितीची जी सभा ता. २९ रोजीं भरली होती, तींत संयुक्त महाराष्ट्र परिषदेची घटना तयार करण्यासाठीं म. म. प्रो. दत्तो वामन पोतदार, आचार्य शं. त्र्यं. धर्माधिकारी व श्री. ए. श्री. पटवर्धन यांची समिति नेमण्यांत आली होती. त्या समितीनें तयार केलेला घटनेचा खर्डा ता. २८ सप्टेंबर १९४६ रोजीं पुणें येथें भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला. ही मंजूर झालेली घटना पुढें दिली आहे:—

**संस्थेचें नांव:**—'संयुक्त महाराष्ट्र परिषद' असें राहील.

**संस्थेची कचेरी:**—मुख्य कचेरी मुंबई येथें राहील व जरूरीप्रमाणें शाखा-कचेऱ्यांची स्थापना कार्यकारी मंडळ वेळोवेळीं करील.

**संस्थेचे सभासद:**—संस्थेचे उद्देश आणि घटना यांस लेखी मान्यता देणाऱ्या आणि संस्थेची ठरलेली वर्गणी भरणाऱ्या १८ वर्षांवरील कोणाहि स्त्रीपुरुषांस संस्थेचे सभासद होतां येईल.

**संस्थेची वर्गणी:**—संस्थेची वर्गणी एकदांच रु. १ ही राहील.

**संस्थेचे उद्देश:**—[१] सर्व सलग मराठीभाषी प्रदेशाचा * एक प्रांत स्थापन करण्यासाठीं खटपट करणें.

* टीप:—सांप्रतचे सलग मराठीभाषी प्रदेश पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

[१] ब्रिटिश मुंबई प्रांतांतील मराठीभाषी भाग [२] ब्रिटिश वऱ्हाड-मध्यप्रांतांतील मराठीभाषी भाग [३] वरील १ व २ या भागांना भिडलेला हैदराबाद वगैरे देशी संस्थानांतील मराठीभाषी भाग आणि [४] पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतक.

[२] ही खटपट करतांना अवश्य तर प्रथम ब्रिटिश अंमलाखालील मराठीभाषी सलग भाग यांचा प्रांत स्थापन करण्याची खटपट करणें आणि या प्रांतास भिडलेला मराठीभाषी भाग साध्य होईल तसा या प्रांतांत सामील करून घेणें.

साधनें:—वरील उद्देशाच्या सिद्धीसाठीं पुढें दिलेल्या व इतर आवश्यक इष्ट उपायांची योजना करणें:—

[१] आवश्यक अशी भाषिक, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक वगैरे प्रकारची साधार व सप्रमाण माहिती गोळा करणें.

[२] सत्ताधिकाऱ्यांकडे शिष्टमंडळें पाठविणें, त्यांना निवेदनें, मागण्या वगैरे सादर करणें, निरनिराळ्या समित्या योजणें, संघटक, प्रचारक वगैरे नेमणे, आवश्यक प्रकाशनें, पुस्तकें, निवेदनें, पत्रकें, नकाशे वगैरे तयार करून प्रसिद्ध करणें किंवा अशा प्रसिद्धीस आर्थिक किंवा इतर साहाय्य देणें, देणग्या मिळविणें, या कार्याला आवश्यक असा कोणताहि खर्च करणें, कामाचा वेळोवेळीं हिशोब व अहवाल प्रसिद्ध करणें, चर्चासभा, संमेलनें व परिषदा भरविणें, लोकमत जागृत व संघटित करणें, आवश्यक सेवकवर्ग नेमणें इत्यादि.

[३] परिषदेचें कार्यकारी मंडळ व प्रतिनिधि सभा ठरविल त्या अन्य उपायांचा अवलंब करणें.

संस्थेची प्रतिनिधिसभा:—(१) संस्थेच्या सभासदांतून त्याविषयींच्या नियमांस अनुसरून निवडलेल्या सभासदांची एक प्रतिनिधि सभा असेल.

(२) प्रतिनिधिसभेंत कमीत कमी ५१ व अधिकांत अधिक २०१ सभासद असतील आणि पहिल्या प्रतिनिधिसभेची मुदत तीन वर्षांपुरती असेल.

(३) प्रतिनिधिसभेचे पदाधिकारी पुढें दिल्याप्रमाणें असतील:—

(अ) (१) अध्यक्ष (२) उपाध्यक्ष ज्यास्तींत ज्यास्त ७ (३) मुख्य चिटणीस १ (४) सहकारी चिटणीस ४ (५) खजिनदार १ आणि (६) सर्व कार्यकारी सभासद ( कार्यकारी मंडळ, नियम पहा )

(आ) वरील (अ) खेरीज प्र. सभेच्या ५१ तें २०१ या नियत संख्येच्या भरतीला आवश्यक असतील इतके साधारण सभासद.

प्रतिनिधिसभेचीं कामें व अधिकार येणेंप्रमाणें राहतील:—

(१) संस्थेच्या उद्देशांच्या सफलतेसाठीं सर्व आवश्यक खटपट करणें.

(२) कार्यकारी मंडळाच्या कामावर देखरेख ठेवणें, कार्यकारी मंडळास सूचना व आदेश देणें.

(३) संस्थेच्या हिशेबाचे तपासणीसाठीं एक किंवा अधिक हिशेबतपासनीसांची नेमणूक करणें.

(४) संस्थेच्या घटनेंत दुरुस्तीपुस्ती करणें.

संस्थेचें कार्यकारी मंडळ, मुदत, गण इ.:—

(१) कार्यकारी मंडळांत पदाधिकाऱ्यांसह १९ सभासद असतील.

(२) प्र. सभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य चिटणीस, सर्व सहकारी चिटणीस, खजिनदार आणि उपाध्यक्ष संख्येच्या मानानें १५ ते २१ कार्यकारी सभासद यांचें कार्यकारी मंडळ राहील.

(३) या कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षांची असेल.

(४) कार्यकारी मंडळाच्या सभेची गणसंख्या सात असेल.

(५) अध्यक्षांना जरूर वाटेल त्यावेळीं परिपत्रकानें निर्णय करण्याचा अधिकार राहील.

कार्यकारी मंडळाचे अधिकार व कामें:—(१) संस्थेच्या उद्देशास, नियमांस व प्रतिनिधिसभेच्या आदेशांस अनुसरून संस्थेचीं सर्व प्रकारचीं काम चालविणें.

(२) प्रतिनिधिसभा व कार्यकारी मंडळ यांतील रिकाम्या जागा भरणें.

(३) घटना व नियम यांत दुरुस्त्यापुस्त्या प्रतिनिधिसभेपुढें सादर करणें.

(४) संस्थेच्या कार्याचा वृत्तांत व हिशेबतपासनीसाकडून तपासवून घेतलेले हिशेब प्रसिद्ध करणें.

(५) प्रतिनिधिसभेच्या साधारण व विशेष सभा भरविणें.

(६) परिषदेचें अधिवेशन बोलावणें.

(७) वर्गणी व देणगी वगैरे जमा करणें, संस्थेसाठीं आवश्यक खर्च करणें, संस्थेच्या नावें बँकांशीं आवश्यक व्यवहार करणें, संघटक, प्रचारक, सेवकवर्ग वगैरेच्या नेमणुका करून त्यांस मेहेनताना देणें, विविध प्रकाशनें करणें किंवा त्यासाठीं साहाय्य देणें, प्रचारप्रवास खर्च करणें, संस्थेचें दप्तर सांभाळणें, सभासदांची पद्धतशीर नोंद ठेवणें, संस्थेच्या कामासाठीं पोटसमित्या नेमणें व त्यांस आपल्या अधिकारांपैकीं जरूर ते अधिकार तोडून देणें, संस्थेच्या घटनेंतील नियमांस बाध न येईल असे आवश्यक ते पोटनियम तयार करणें आणि प्रतिनिधिसभेकडे राखून ठेवलेल्या कामांखेरीज अन्य प्रकारचीं कार्यें स्वाधिकारांत उरकणें.

प्रतिनिधिसभेच्या सभा:—प्रतिनिधिसभा अस्तित्वांत आणणें व तिची पहिली सभा भरविणें वगैरे कामें तात्पुरतें कार्यकारी मंडळ करील.

(२) यानंतरच्या सभा या घटनेंतील नियमांप्रमाणें निवडलेलें नवीन कार्यकारी मंडळ भरवील.

(३) प्रतिनिधिसभेचे अध्यक्ष किंवा त्यांच्या लेखी आदेशानुसार मुख्य चिटणीस यांस प्र. सभेची विशेष सभा बोलावण्याचा अधिकार राहील.

(४) प्रतिनिधिसभेच्या पटावरील कोणीहि २५ किंवा पटावरील एकूण संख्येच्या एकतृतीयांश यांपैकीं जी जास्त संख्या असेल त्या संख्येच्या सभासदां-कडून प्र. सभेच्या सभासदांची विशेष सभा बोलावण्याची लेखी यादी मुख्य

कचेरीकडे आल्यावर, सदरहू मागणी-सभा, सदरहू यादी पोंचल्यापासून एक महिन्याच्या आंत बोलाविली पाहिजे. यादी देणाऱ्या सभासदांनीं आपल्या मागणी-यादींत सभेपुढें विचारार्थ ठेवावयाचा विषय स्पष्ट शब्दांत ग्रथित केला पाहिजे. अशा ग्रथित केलेल्या विषयाशिवाय अन्य कोणताहि विषय अशा विशेष सभेंत विचाराशाठीं घेतां येणार नाहीं.

(५) प्रतिनिधिसभेच्या कोणत्याहि साधारण सभेची पूर्वसूचना प्रत्येक सभासदाकडे १५ दिवसांच्या मुदतीनें पाठविली जाईल.

(६) प्रत्येक सभासदाचा पटावर नोंदलेला पत्ता प्रमाण समजला जाईल.

(७) प्रतिनिधिसभेची गणसंख्या २१ असेल.

**संस्थेच्या कारभाराची भाषाः**—मराठी राहील.

**संस्थेचें दप्तरः**—अध्यक्षांचे लेखी परवानगीनें कोणाहि सभासदास कचेरीच्या सोईप्रमाणें पहाण्याचा अधिकार राहील. कार्यकारी मंडळाचे सभासदास मात्र सदर परवानगीची आवश्यकता नाहीं.

**इतरः**—[१] प्रतिनिधिमंडळ व कार्यकारी मंडळ यांची पहिली निवडणूक, सभासदांची नोंद करणें वगैरे सर्व कामें तात्पुरत्या कार्यकारी मंडळानें करावयाचीं आहेत.

[२] वऱ्हाड जिल्हे ४, नागपूर ४+२, महाराष्ट्र १०, मराठवाडा ६, मुंबई, गोमंतक आणि संस्थानें मिळून प्रमुख ३० ते ३५ केंद्रें करावींत. प्रत्येक केंद्राची क्षेत्रमर्यादा आंखून द्यावी. सभासदनोंद केंद्रवार व्हावी. ३१ ऑक्टोबरअखेर झालेल्या सभासदांतून पुढीलप्रमाणें प्रतिनिधिसभेची निवडणूक केंद्रवार व्हावी.

[३] पहिल्या २०० सभासदांमागें १, ५०० सभासद झाल्यास २ व १००० किंवा अधिक झाल्यास ३ याप्रमाणें प्रतिनिधिसभेवर सदस्यत्व दिलें जाईल. कोणत्याहि केंद्रास तीन पेक्षां जास्त प्रतिनिधि मिळणार नाहीत.

(४) एक लाखापेक्षां जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांचें स्वतंत्र केंद्र समजलें जाईल व त्यांना सदस्यसंख्येच्या प्रमाणांत ३ प्रतिनिधि निवडण्याचा हक्क राहील.

(५) प्रतिनिधिसभेवर अध्यक्षांना ५ सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार राहील.

---

मुद्रक : म. गं. दातार, नरकेसरी छापखाना, नागपूर.
प्रकाशक : ग. त्र्यं. माडखोलकर, चिटणीस, संयुक्त महाराष्ट्र परिषद, नागपूर.

# संयुक्त महाराष्ट्र परिषद

## त्रोटक वृत्त
## व
## कार्य

# संयुक्त महाराष्ट्रासंबंधीं कांहीं उद्बोधक आंकडे ( सरकारी अहवालांच्या आधारें )

**क्षेत्रफळ व लोकसंख्या :—**

| | क्षेत्रफळ (चौ. मैल) | एकंदर लोकसंख्या | अंदाजें मराठी मातृभाषिक | मराठी भाषिकांचें लोकसंख्येशीं शेंकडाप्रमाण. |
|---|---|---|---|---|
| मुंबई प्रांतांतील महाराष्ट्र | ४७२८६ | १२९१३५४४ | १००४५११० | ७७·८ |
| मध्यप्रांतांतील महाराष्ट्र (महाविदर्भ) | ३६८६५ | ७०२०६९४ | ५३८८३९० | ७६·७ |
| **एकूण प्रारंभिक संयुक्त महाराष्ट्र** | ८४१५१ | १९९३४२३८ | १५४३३५०० | ७७·४ |
| मुंबई प्रांतांतील मराठी संस्थानें | ११३१४ | २७२०२०७ | २१२०६२० | ७७·९ |
| निजामचे राज्यांतील मराठवाडा | २२७६६ | ४२४९२७२ | ३२९९३४० | ७७·६ |
| गोमंतक | १५३४ | ५८०००० | ५२०००० | ८९·६ |
| बस्तर * | १३७०१ | ६३३८८८ | २१२३१० | ३३·५ |
| **एकूण संयुक्त महाराष्ट्र** | १३३४६६ | २८११७६०५ | २१५८[illegible]७८० | ७६·८ |

**संयुक्त महाराष्ट्र प्रांताचें ( संभाव्य ) सरकारी उत्पन्नः—**

| | रुपये |
|---|---|
| मुंबई प्रांतातिल महाराष्ट्र | २३६९४१००० |
| मध्यप्रांतातील महाराष्ट्र (महाविदर्भ) | ५०६०५[illegible] |
| **एकूण प्रारंभिक संयुक्त महाराष्ट्र** | २८७५४६००० |
| मुंबई प्रांतांतील मराठी संस्थानें | २७५४७००० |
| निजामचे राज्यांतील मराठवाडा | ५२८००००० |
| गोमंतक | ४१००००० |
| बस्तर | २५११००० |
| **एकूण संयुक्त महाराष्ट्र** | ३७४५०४००० |

संयुक्त महाराष्ट्राच्या निश्चित सरहद्दी ठरल्यानंतर सरहद्दीवरील संयुक्त महाराष्ट्राशीं सलग असलेला सुमारें ६ ते ७ हजार चौरस मैलांचा प्रदेश व पांच ते सहा लाख लोकसंख्या संयुक्त महाराष्ट्रांत येण्याचा संभव आहे.

* यांतील मराठी भाषिकांचें प्रमाण शें. ३३.५ असलें तरी तेथें बोलली जाणारी ' हल्बी ' भाषा ही मराठीचीच एक फुटकीतुटकी बोली आहे असा भाषाशास्त्रज्ञांचा अभिप्राय असल्यामुळें बस्तरचा समावेश संयुक्त महाराष्ट्रांत केला आहे.

# त्रोटक वृत्त व कार्य

**थोडा पूर्वेतिहास**

ता. १२ मे १९४६ रोजीं बेळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांत संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण करण्यासंबंधीचा ठराव मंजूर होऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठीं 'संयुक्त महाराष्ट्र समिती' नेमण्यांत आली. या समितीची पहिली सभा पुणें येथें ता. २६ मे १९४६ रोजीं होऊन त्यामध्यें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांसंबंधींचें लोकमत प्रकट व संघटित करण्यासाठीं मुंबईस महाराष्ट्र एकीकरण परिषद बोलावण्याचें ठरलें. त्याप्रमाणें ता. २८ जुलै १९४६ रोजीं मुंबई येथें महाराष्ट्र एकीकरण परिषदेचें अधिवेशन श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखालीं झालें, व त्यांत भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार हिंदुस्थानांतील सलग मराठी भाषी प्रदेशाचा एक प्रांत शक्य तितक्या लवकर निर्माण करण्यांत यावा अशा आशयाचा पहिला ठराव मंजूर करण्यांत आला. याच अधिवेशनांतील दुसऱ्या ठरावानें पहिल्या ठरावांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें असा प्रांत निर्माण करण्यासाठीं जरूर ती सर्व खटपट करण्यासाठीं 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' या नांवाची स्वतंत्र संस्था स्थापन करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें. याच वेळीं या परिषदेची एक तात्पुरती समिती नेमण्यांत आली व श्री. शंकरराव देव यांनाच तिचें अध्यक्ष नेमलें. या तात्पुरत्या समितीची सभा ता. २९ जुलै १९४६ ला मुंबई येथें भरून त्यांतून एक तात्पुरतें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें. परिषदेची घटना तयार करण्यासाठीं एक पोटकमिटी नियुक्त करण्यांत आली व संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें उद्देश मान्य असणाऱ्या १८ वर्षांवरील कोणाही स्त्री–पुरुषास एक रुपया वर्गणी देऊन परिषदेचे सदस्य होतां येईल असें ठरविण्यांत आलें. तसेंच संयुक्त महाराष्ट्र प्रांताच्या राज्यघटनेचा खर्डा तयार करण्यासाठींहि एक उपसमिती नेमण्यांत आली. ता. २८ सप्टेंबर १९४६ रोजीं पुणें येथें तात्पुरत्या कार्यकारी मंडळाची सभा भरून त्यांत म. म. पोतदार–समितीनें तयार केलेला संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या घटनेचा मसुदा मंजूर करण्यांत आला. या मंजूर केलेल्या घटनेप्रमाणें ता. ३१ ऑक्टोबर १९४६ पर्यंत परिषदेचे जे सभासद होतील त्यांतून परिषदेच्या प्रतिनिधींची निवडणूक करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें.

**संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे उद्देश:—**

[अ] हिंदुस्तानांत लोकशाही राज्यघटना यशस्वी करण्यासाठीं प्रांतरचना भाषावार करणें हेंच इष्ट आणि आवश्यक आहे असा या परिषदेचा विश्वास असल्यामुळें सर्व सलग मराठीभाषी प्रदेशाचा एक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करण्यांत यावा.

[आ] सध्यां या मराठी प्रदेशाचे पुढीलप्रमाणें तुटक विभाग पडलेले आहेतः—

(१) (ब्रिटिश) मुंबई प्रांतांतील मुंबई शहरासह मराठीभाषी भाग.

(२) (ब्रिटिश) वऱ्हाड-मध्यप्रांतांतील मराठीभाषी भाग.

(३) या दोन्ही भागांस भिडलेला हैद्राबाद वगैरे देशी संस्थानांतील मराठी-भाषी भाग आणि

(४) पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतक.

[इ] या तुटक विभागांपैकीं जेवढा विभाग आज साक्षात् ब्रिटिश (आतां हिंदी संघराज्य) सत्तेखालीं आहे, तेवढा तरी प्रथम अलग करून त्या सर्व विभागाचा एक मराठी प्रांत तावडतोब बनविण्यांत यावा आणि नंतर क्रमानें राहिलेले विभाग, साध्य होईल तसतसे, या मराठी प्रांतांत समाविष्ट करण्यांत यावेत.

परिषदेचें हें उद्देशपत्रक असून परिषदेचे सदस्य होऊं इच्छिणाऱ्या व्यक्तींना त्याला संमति द्यावी लागते व सदस्यत्वाची वर्गणी फक्त रु. १ हयातींत एकदांच द्यावयाची असते.

या उद्देशपत्रकावर सही करून ता. ३१ आक्टोबर १९४६ अखेर सर्व महाराष्ट्रांत परिषदेचे १३८०३ सभासद झाले व यांतून संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधी-मंडळाची ता. १५।१२।४६ रोजीं निवडणूक झाली. मुंबई शहर, महाराष्ट्र, गोमंतक नागपूर व विदर्भ, मराठवाडा यांतील परिषदेच्या सर्व सभासदांनीं घटनेतील नियमा-प्रमाणें परिषदेच्या प्रतिनिधीमंडळावर ४४ प्रतिनिधी निवडून दिले. या प्रतिनिधी-मंडळाची रीतसर पहिली सभा जळगांव येथें ता. १३ व १४ एप्रिल रोजीं झाली. महाराष्ट्र एकीकरण परिषदेनें नियुक्त केलेली पूर्वीची तात्पुरती समिति रद्द करण्यांत आली व घटनेप्रमाणें रीतसर प्रतिनिधीमंडळानें परिषदेचे उद्देश साध्य करण्यासाठीं आपलें एक कार्यकारी मंडळ निवडलें. यांत,

अध्यक्ष— श्री. शंकरराव देव, पुणें.

उपाध्यक्ष —(१) म. म. प्रो. द. वा. पोतदार, पुणें. (२) श्री. केशवराव जेधे, पुणें. (३) श्री. ब्रिजलाल बियाणी, अकोला. (४) श्री. पुनमचंद रांका, नागपूर. (५) श्री. दिगंबरराव बिंदु, हैद्राबाद.

कोषाध्यक्ष— श्री. दा. वि. गोखले, पुणें.

मुख्य कार्यवाह— श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, नागपूर.

कार्यवाह—(१) श्री. श्री. शं. नवरे, मुंबई. (२) डॉ. कृ. भी. अंत्रोळीकर, सोलापूर. (३) श्री. व. ना. नाईक, नाशिक. (४) सौ. प्रमिला ओक, अकोला.

आणि १४ कार्यकारी सभासद व एक हिशेबतपासनीस आहेत.

ता. १३ व १४ एप्रिल रोजीं जळगांव येथें भरलेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधी सभेच्या या पहिल्या अधिवेशनांत एकंदर सहा ठराव एकमतानें मंजूर करण्यांत आले. त्यांपैकीं महत्त्वाचा पहिला ठराव पुढीलप्रमाणें आहे:—

" संयुक्त महाराष्ट्र परिषदेची जळगांव येथें भरलेली ही सभा जुलै १९४६ मध्यें मुंबई शहरीं भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेमध्यें संमत झालेल्या महाराष्ट्र एकीकरण-विषयक ठरावाची पुनर्घोषणा करीत आहे. या सभेचा असा दृढ अभिप्राय आहे कीं, भावी स्वतंत्र हिंदी संघराज्याचे संपूर्ण स्वायत्त घटक हे एकजिनसी व एकभाषी घटकच असले पाहिजेत. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करतां मुख्यतः मराठी भाषा बोलणाऱ्या सलग प्रदेशांतील म्हणजे मुंबई शहरासह मुंबई प्रांत आणि मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील मराठी भाषा बोलणारा प्रदेश एकाच राजकीय घटका-मध्यें आणला पाहिजे. अशा तऱ्हेचा संयुक्त महाराष्ट्राचा घटक बनविणें हें घटनासमि-तीच्या कार्यापैकीं अंगभूत कार्य असलें पाहिजे. याच दृष्टीनें मुंबई असेंब्लीनें नुकत्याच झालेल्या आपल्या अंदाजपत्रकी अधिवेशनामध्यें घटनासमितीनें हा प्रश्न लवकर हातांत घेण्याविषयीं जो ठराव मंजूर केला त्याबद्दल या सभेला समाधान वाटत आहे."

तसेंच कांहीं शंकांचें निराकरण करण्यासाठीं क्रमांक तीनचा ठराव मंजूर करण्यांत आला तो पुढीलप्रमाणें आहे:—

" कांहीं जणांकडून व्यक्त करण्यांत येणाऱ्या भीतीचें निवारण करण्यासाठीं ही सभा निःसंदिग्धपणें असें जाहीर करते कीं, एकजिनसी भाषावार प्रांतरचना करतांना त्या प्रांतांत रहाणाऱ्या अन्य प्रांतांतील अथवा अन्य भाषा बोलणाऱ्या लोकांच्या वाजवी हक्कांस बाध येणार नाहीं. तसेंच जात, मत, धर्म किंवा जन्मस्थान यांवर आधा-रलेला कोणताही पंक्तिप्रपंच करण्यांत येणार नाहीं. विशिष्ट तत्त्वावर प्रांतांची पुनर्रचना करण्याचें पर्यवसान म्हणून त्या प्रांतांत वसाहत करणाऱ्या कोणत्याही लोकांच्या गटा-विरुद्ध किंवा कोणत्याही गटाचे बाजूनें भेदाभेद करण्याचें कारण असणार नाहीं किंवा उद्भवणार नाहीं किंवा तशी शक्यता नाहीं, असें ही सभा जाहीर करीत आहे."

बाकीच्या चार ठरावांचा आशय पुढीलप्रमाणें आहे:— (१) वऱ्हाड प्रांत स्वतंत्र हिंदुस्तानचाच एक घटक रहावा, (२) भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाप्रमाणें हिंदी संघराज्यां-तील नवीन घटकांच्या (प्रांतांच्या) सीमा ठरविण्यासंबंधीं, (३) सुरगाणा, जव्हार व जंजिरा या संस्थानांचा समावेश मराठीभाषिक दक्षिणी संस्थानांच्या संघामध्यें करण्यांत यावा, (४) संघराज्याचे घटक एकजिनसी व एकभाषी बनविण्यानें सार्वभौम हिंदी संघराज्याची कायम स्वरूपाची घटना तयार करण्याचे मार्गांतील अनेक अडचणींचे निराकरण होण्याचा संभव आहे.

मुंबई शहराचा अंतर्भाव संयुक्त महाराष्ट्रांत होतो हें स्पष्ट करण्यासाठीं एक स्वतंत्र ठराव अधिवेशनापुढें विचारार्थ आला होता; परंतु संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या मूळ

उद्देशपत्रिकेंत "मुंबई प्रांतांतील मुंबई शहरासह सर्व मराठीभाषी भाग" अशी दुरुस्ती करणारी सूचना मंजूर झाल्यामुळें हा ठराव मागें घेण्यांत आला. या सूचनेप्रमाणें परिषदेच्या उद्देश पत्रिकेंत तावडतोब दुरुस्ती करण्यांत आली.

**परिषदेनें केलेलें कार्य**

परिषदेनें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यांत आपले संघटक नेमून त्यांचे मार्फत परिषदेचे सभासद करणें, परिषदेच्या कार्याचा व्याख्यानद्वारा प्रचार करणें, परिषदेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या पत्रकांचा प्रसार करणें इत्यादि कामें केलीं. जळगांव अधिवेशनानंतर झालेले परिषदेचे सर्व सभासद धरून आजतागायत परिषदेच्या सभासदांची संख्या अंदाजें वीस हजार होईल. (अजून संपूर्ण अहवाल एकत्रित व्हावयाचा आहे.)

परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव यांनीं दिल्ली येथें ता. ९ डिसेंबर १९४६ रोजीं घटना समिती, मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदे मंडळें व प्रांतिक कॉंग्रेस कमिटया यांतील भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करणाऱ्या सदस्यांची एक अनौपचारिक परिषद डॉ. पट्टाभी सितारामय्या यांचे अध्यक्षतेखालीं भरविली होती. वरील संस्थांतील १५० सदस्य त्यास हजर होते. परिषदेंत भाषावार प्रांतांच्या पुनर्घटनेची मागणी करण्यांत येऊन त्याचे पूर्तीची खटपट करण्यसाठीं म्हणून १७ सदस्यांचें एक कार्यकारी मंडळहि निवडण्यांत आलें.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याचे मार्गांतील अंतर्गत अडचणींचें निराकरण करण्याचे दृष्टीनें परिषदेनें बरीच खटपट केली असून परस्पर विचारविनिमय व तडजोड करून कांहीं महत्त्वाचे प्रश्न सोडविले आहेत. महाविदर्भाचा प्रश्न अशांपैकीं होता. वऱ्हाड–नागपूरच्या मराठीभाषिक आठ जिल्ह्यांचा संयुक्त महाराष्ट्रांत समावेश न करतां त्यांचा महाविदर्भ या नांवाचा एक स्वतंत्र प्रांत बनविण्यांत यावा अशी त्या भागांतील लोकांची मागणी होती. तेव्हां या प्रश्नाबाबत वऱ्हाड–नागपूरकडच्या प्रमुख पुढाऱ्यांशीं संयुक्तमहाराष्ट्र परिषदेच्या प्रमुख कार्यकर्त्यांची अकोला येथें ता. ७ व ८ ऑगस्ट १९४७ रोजीं चर्चा होऊन सर्वसंमत असा एक करार करण्यांत आला. या करारान्वयें भावी संयुक्त महाराष्ट्राच्या राज्यघटनेंत महाविदर्भाला एका उपप्रांताचा दर्जा देऊन त्याचा समावेश संयुक्त महाराष्ट्राच्या नवीन होणाऱ्या प्रांतातच करण्यांत यावा असें ठरलें. या करारावर १७ पुढाऱ्यांच्या सह्या घेण्यांत आल्या. अशा रीतीनें संयुक्त महाराष्ट्राचे मार्गांतील एक मोठी अडचण निवारण करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

मुंबई शहराचा प्रश्नहि असाच तडजोडीनें सुटावा म्हणून मुंबईतील प्रमुख कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय करण्यासाठीं अध्यक्ष श्री. शंकरराव देव यांनीं ता. १८ डिसेंबर १९४७ व ता. २ जानेवारी १९४८ रोजीं अनौपचारिक सभा मुंबई येथें

घेतल्या. डॉ. जयकर व संयुक्त महाराष्ट्रासंबंधीं आस्था बाळगणारे निरनिराळ्या पक्षांतील प्रमुख लोक हजर होते. मुंबई शहराचा समावेश संयुक्त महाराष्ट्रांतच होतो यांबाबत तेथें जमलेल्या सर्वांचें एकमत होतें आणि तें साध्य होण्याचे दृष्टीनें निरनिराळ्या योजनाहि सुचविण्यांत आल्या. त्याप्रमाणें प्रयत्न चालू आहेत.

संयुक्त महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कर्नाटकाच्या सरहद्दीवरील मराठी भाषिकांच्या भागाची पहाणी करून त्यांचा प्रदेश संयुक्त महाराष्ट्राच्या मराठीभाषी प्रदेशाशीं सलग असल्यामुळें व त्या भागांत त्यांची ( मराठी भाषिकांची ) बहुसंख्या असल्यामुळें तो प्रदेश भावी संयुक्त महाराष्ट्रास जोडण्यांत यावा अशी तिकडील लोकांची इच्छा आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें संयुक्त महाराष्ट्राच्या क्षेत्रविस्तारांत या भागांचा समावेश केलाच आहे. त्यांच्या मागणीस पाठिंबा देऊन परिषदेबद्दल त्यांच्यामध्यें विश्वास निर्माण करण्यासाठीं परिषदेचे उपाध्यक्ष श्री. केशवराव जेधे यांनीं त्या भागांत दौरा काढून परिस्थितीची पहाणी केली. महाविदर्भाच्या सरहद्दीवरील बालाघाट, खांडवा, बैतुल, छिंदवाडा या जिल्ह्यांतील बहुसंख्य मराठी भाषिकांनींहि आपल्या कैफियती तयार केल्या असून संयुक्त महाराष्ट्राशीं सलग असणाऱ्या बहुसंख्य मराठीभाषी भागाचा संयुक्त महाराष्ट्रांत समावेश करण्यांत यावा अशी त्यांची मागणी आहे. परिषदेच्या कार्यकर्त्यांनीं या सरहद्दीवरील मराठी भाषिकांना सहानुभूति दर्शविली असून ते आमच्यापासून वेगळे होणार नाहींत याबद्दल शक्य ती खटपट करण्याचे ठरवून त्यांचा विश्वास संपादन केला आहे.

परिषदेनें आपल्या कार्याच्या प्रचारार्थ वेळोवेळीं निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध केलीं आहेत. यांतील 'Unification of Maharashtra' 'The constitution of Federating Units' 'The Formation of New Provinces', 'Powers and Functions of a sub-province' हीं डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनीं लिहिलेलीं प्रमुख पत्रकें आहेत. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुटण्यास या पत्रकांचा बराच उपयोग झाला आहे. यांचीं मराठी भाषांतरेंही परिषदेनें पत्रकरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत. परिषदेनें आपल्या अधिवेशनाचे अहवाल व परिषदेचें प्रतिवृत्त हींहि प्रसिद्ध केलीं आहेत. शिवाय वेळोवेळीं परिषदेच्या कार्यास चालना मिळावी या दृष्टीनें परिषदेच्या अध्यक्षांनीं आपलीं निवेदनें अगर पत्रकें वर्तमानपत्रांतून अगर स्वतंत्रपणें प्रसिद्ध केलीं आहेत.

---

परिषदेनें संयुक्त महाराष्ट्राचा सरकारी खानेसुमारी अहवालावरून एक अधिकृत नकाशा तयार केला असून तो २०×३० इंच आकारांत दोन रंगांत छापून प्रसिद्ध केला आहे. त्याची किंमत आठ आणे ठेवण्यांत आली आहे. या नकाशाचा खूप प्रसार झाला

असून पहिली २०,००० आवृत्ति संपल्यामुळें दुसरी आवृत्ति काढावी लागली आहे. प्रश्न नकाशासंबंधीं अनेक वर्तमानपत्रांचे व प्रमुख व्यक्तींचे चांगले अभिप्राय आलेले आहेत.

परिषदेनें संयुक्त महाराष्ट्रासंबंधीं संपूर्ण माहिती देणारें एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें असून तें सध्यां छापत आहे. या पुस्तकांत, ऐतिहासिक भागाचा भाषावर प्रांतरचनेच्या व संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांचा ऊहापोह केला असून पुढें संयुक्त महाराष्ट्राची लोकसंख्या, क्षेत्रविस्तार, सरकारी उत्पन्न, जमीन व जमिनीचें उत्पन्न, उद्योगधंदे, कारखाने, हवामान-पाऊसपाणी इत्यादिसंबंधीं सविस्तर आंकडेवार माहिती देण्यांत आली आहे.

परंतु परिषदेच्या कार्याचें खरें यश अखेर नवीन राज्यघटनेंत संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण होण्यावरच अवलंबून आहे. या दृष्टीनें परिषदेनें आपले प्रयत्न नेटानें चालू ठेवले आहेत परंतु संयुक्त महाराष्ट्रांतील सर्व मराठी भाषिकांचें बळ त्यामागें असल्याखेरीज परिषदेच्या कार्यास यश येणें कठीण आहे. विशेषतः अंतर्गत प्रश्नांच्या अडचणी आपण राहूं देतां नये. मुंबई शहराचा प्रश्न संयुक्त महाराष्ट्रासंबंधीं आस्था बाळगणाऱ्या सर्वांनी आपल्यांतील कांहीं व प्रामुख्यानें बाहेरील शक्तींशीं वा व्यक्तींशीं विचारविनिमय करून समाधानकारक रीतीनें सोडविण्याचा कसून प्रयत्न करणें जरूर आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या सरहद्दी निश्चित करण्याचा प्रश्न तेवढा कठीण नाहीं. तो तडजोडीनें सुटण्याचा संभव आहे. विवाद्य मुद्यांसंबंधीं अगर भागांसंबंधीं निर्णय पुढें एकादी सीमानिर्णयसमिती देईल व तो सर्वांनाच बंधनकारक राहील. महाविदर्भाचा प्रश्न जसा तडजोडीनें सुटला तसा मुंबई शहराचा प्रश्नही तडजोडीनें सोडविला जाणें जरूर आहे. आपण आपल्या अंतर्गत अडचणींचें निवारण केल्यानंतर हिंदी संघराज्य सरकारें आपल्या मागणीकडे दुर्लक्ष करणें शक्य नाहीं. संघराज्य सरकारला या आपल्या अंतर्गत अडचणींकडे बोट दाखविण्यास आपण संधि देऊं नये. भारताच्या नवीन होणाऱ्या घटनेंतच आपण ' संयुक्त महाराष्ट्र ' हा सर्व सलग मराठीभाषी प्रदेशाचा एक प्रांत निर्माण केला जावा अशी खटपट करणें जरूर आहे. संघराज्य सरकारनें हें भाषावार प्रांत निश्चित करण्यासाठीं एकादें चौकशी कमिशन नेमल्यास परिषद त्या कमिशनपुढें संयुक्त महाराष्ट्राची संपूर्ण बाजू मांडलिच. परंतु सर्वांचा पाठिंबा परिषदेच्या कार्यास असणें अत्यंत अवश्य आहे. या पाठिंब्याच्या बळावरच अखेर संयुक्त महाराष्ट्र निर्माण होणार आहे.

---

प्रकाशकः— श्री. शंकरराव देव, अध्यक्ष संयुक्त महाराष्ट्र परिषद्
२१९ शिवाजीनगर पुणें.
मुद्रकः— ह. मो. जोशी, विश्वास प्रेस, २९१ शनिवार पेठ, पुणें नं. २.